दैनिक
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक
# राष्ट्र सह्याद्री

• संपादक : काकासाहेब नवले • RNI No. MAHMAR /2019/82605 • वर्ष ६ वे • अंक २६२ • बुधवार, ०२ जुलै २०२५ • www.rashtrasahyadri.com • पाने ८ • मूल्य रु. ४.००

## संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेचे अध्यक्षपद पाकिस्तानकडे

**नवी दिल्ली :** संयुक्त राष्ट्राच्या सर्वात महत्त्वाचं अंग असलेल्या सुरक्षा परिषदेच्या अध्यक्षपदी पाकिस्तानची निवड झाली आहे. १९३ पैकी १८२ देशांचा पाठिंबा मिळवून पाकिस्तान या पदावर विराजमान झाला. दहशतवादाला पोसणारा पाकिस्तानच संयुक्त राष्ट्रामध्ये आता स्थानावर गेल्यामुळे भारताची मात्र डोकेदुखी वाढण्याची शक्यता आहे. पाकिस्तानने संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या अध्यक्षपदाची सूत्रे मंगळवारी (१ जुलै) हाती घेतली आहेत. याआधी जानेवारी २०२४ मध्ये पाकिस्तानची दोन वर्षांसाठी संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेचा अस्थायी सदस्य म्हणून निवड झाली होती.



# सभागृहात गदारोळ, पटोले निलंबित

## विधिमंडळ अधिवेशनाचा दुसरा दिवस : शेतकऱ्यांचा अवमान, मोदींचा एकेरी उल्लेख

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**मुंबई :** कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि भाजप आमदार बबनराव लोणीकर यांनी शेतकऱ्यांबद्दल अपशब्द वापरल्याने विधिमंडळात काँग्रेस नेते नाना पटोले यांनी संताप व्यक्त केला. 'मोदी तुमचा बाप असू शकतो, शेतकऱ्यांचा नाही' असे म्हणत पटोले यांनी थेट सभापतींच्या आसनाजवळ जाऊन राजदंडाला हात लावला. मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांची माफी मागावी अशी मागणी त्यांनी केली. यावेळी मोठा गदारोळ झाला. त्यानंतर सभापती राहुल नार्वेकर यांनी पटोले यांना दिवसभरासाठी कामकाजातून निलंबित केले.

राज्य विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधानसभेत मोठा गदारोळ झाला. काँग्रेस नेते नाना पटोले यांनी भाजप आमदार बबनराव लोणीकर आणि राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांविरोधात केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावरून सभागृहात संताप व्यक्त केला. त्यानंतर नाना पटोले हे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या जागेजवळ गेले आणि त्यांनी राज दंडाला हात लावला. नाना पटोले म्हणाले की, या सरकारमधले सदस्य बबनराव लोणीकर आणि राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे ज्या पद्धतीने सातत्याने शेतकऱ्यांचा अपमान करत आहेत. हा अपमान आता राज्यातील शेतकरी सहन करणार नाही. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी या राज्याच्या शेतकऱ्यांची जाहीर माफी मागितली पाहिजे. मोदी तुमचा बाप असेल, शेतकऱ्यांचा बाप होऊ शकत नाही. असे वक्तव्य अजिबात चालणार नाही. त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, असे म्हणत नाना पटोले यांनी (पान ४ वर)

### ● चर्चेत राहण्यासाठी पटोलेंकडून मोदींचा एकेरी उल्लेख

केवळ चर्चेत राहण्यासाठी काँग्रेसच्या नाना पटोले यांनी मोदींचा एकेरी उल्लेख केला, सभागृहातील राजदंड उचलण्याचा प्रयत्न केला असल्याची टीका राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. मोदींवर टीका करून चर्चेत राहता येतं, त्यामुळे 'बाप तो बाप होता है' असा टोलाही शिंदेंनी नाना पटोले यांना लगावला.

राज्यातील शेतकऱ्यांना आज शुभेच्छा देतो. महायुतीचं सरकार आहे, त्यांची वास्तविकता आज समोर आली. कृषिमंत्री, आमदार हे शेतकऱ्यांना भिकारी समजतात. शेतकऱ्यांना मदत दिली जात नाही. बोनस देत नाहीत. कर्जमाफी करण्याची भूमिका मांडली होती, पीकविमा बंद केला. हे सरकार शेतकरी विरोधी आहे. शेतकऱ्यांचा अपमान सहन करणार नाही. बबनराव लोणीकर यांच्यावर कारवाई होत नाही तोपर्यंत शांत बसणार नाही. रोज हा विषय मांडू, आम्हाला निलंबित करायचं असेल तर करा.

**– नाना पटोले**

# अरुण तनपुरेंच्या मनगटी आश्वासनांचे घड्याळ

## कारखाना सुरू होण्याचा मार्ग प्रशस्त, राजकारणाला कलाटणी मिळणार



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** डॉ. तनपुरे साखर कारखान्याच्या निवडणुकीत अरुण तनपुरे यांच्या नेतृत्वाखाली जनसेवा मंडळाने विरोधी पक्षाचे पानिपत करून एकहाती सत्ता मिळवली. या निवडणुकीच्या प्रचारादरम्यान अरुण तनपुरे यांनी सभासद व कामगारांना शब्द दिला होता की, डॉक्टर तनपुरे कारखाना सुरू करण्याचे शिवधनुष्य मी उचललेले आहे. माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी तुम्हाला लवकरच गोड बातमी मिळेल असे प्रचारात सांगितल्यानंतर अरुण तनपुरे (पान ४ वर)

### ● ते मान्यवर कार्यकर्ते कोण ?

अजित पवार यांनी अधिवेशन संपल्यानंतर देवळाली प्रवरा हे माझे आजोळ आहे व राहुरीवर माझे विशेष प्रेम आहे. त्यामुळे राहुरीकरांसाठी मी खास एक दिवस येऊन राहिलेल्या मान्यवर कार्यकर्त्यांना आपल्या पक्षात प्रवेश देणार आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे आता राहुरीमध्ये अजित पवार गटाची ताकद मोठ्या प्रमाणात वाढणार असून हे राहिलेले मान्यवर कार्यकर्ते कोण, याकडे राहुरीकरांचे लक्ष लागले आहे.

### ● यांनी केला प्रवेश

अरुण तनपुरे, त्यांचे चिरंजीव कारखान्याचे नवनिर्वाचित संचालक हर्ष तनपुरे यांच्यासह नगरपरिषदेचे आजी-माजी नगरसेवक, माजी उपनगराध्यक्ष, बँकेचे संचालक, डॉ तनपुरे कारखान्याचे आजी-माजी संचालक, आदर्श पतसंस्थेचे उपाध्यक्ष, बाजार समितीचे आजी-माजी संचालक, अशा मान्यवरांनी पक्षात प्रवेश केलाय.

### झापुक । zupuk

इथे राबून राबून
झाली आमची माती
तुम्ही आश्वासनांची
ढेकळे देता आमच्या हाती
आमचे चाकर म्हणत
तुम्ही खाता लोणी
आम्हाला साधी मिळत
नाही एक युरियाची गोणी

**नवनाथ कुताळ,**
**9422231825**

## पंढरपूर वारीत मृत्यू झाल्यास
# कुटुंबीयांना ४ लाखांची आर्थिक मदत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पंढरपूर :** विठ्ठलाच्या भेटीसाठी पंढरपूरला पायी जाणारे हजारो वारकरी शेकडो मैल अंतर कापत पंढरपुरात येतात . २५० किमीच्या प्रवासात काट्या कुट्यातून,चिखलातून माऊलीचा गजर करत पंढरीच्या वारीला निघतात. यंदा महाराष्ट्र सरकारने वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून वारीदरम्यान कोणत्याही प्रकारच्या अपघातात वारकऱ्यांचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयांना सरकारकडून चार लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार आहे .यासंदर्भातलं नवं परिपत्रक महसूल विभागाने जाहीर केला आहे.

या निर्णयामुळे वारीदरम्यान घडणाऱ्या अनपेक्षित घटनांमध्ये वारकऱ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक आधार मिळणार आहे. १६ जून ते १० जुलै २०२५ या कालावधीत वारीदरम्यान जर एखाद्या वारकऱ्याचा अपघात, विषबाधा किंवा इतर नैसर्गिक कारणामुळे मृत्यू झाला, तर त्यांच्या कुटुंबीयांना ही रक्कम मिळणार आहे. मात्र आत्महत्येच्या (पान ४ वर)

### मदतीची तरतूद काय?

* अपघाताने व दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या निकटच्या वारसदारांस ४ लाखांची मदत * वारीदरम्यान अपंगत्व आलेल्या वारकऱ्यांना ४० ते ६० टक्के अपंगत्व आल्यास ७४,००० * ६० टक्क्यांवरून अधिक अपंगत्व आल्यास २.५० लाख * एका आठवड्यापेक्षा अधिक कालावधीसाठी इस्पीतळात दाखल झाल्यास १६००० रुपये * एक आठवड्यापेक्षा कमी कालावधीसाठी दाखल असल्यास ५४०० रुपयांची मदत

## संरक्षक कठड्याला धडकल्याने दुचाकी जळून खाक; पेटलेल्या गाडीखाली अडकून तरुणाचा मृत्यू



**श्रीगोंदा :** श्रीगोंदा ते जामखेड महामार्गावर आढळगाव येथे सिध्देश्वर मंदीर परिसरात दुचाकीने वळणावरील संरक्षक कठड्यास जोरदार धडक दिली. धडक बसल्यानंतर गाडीने पेट घेतल्यामुळे गंभीर जखमी झालेला दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला असून अन्य एक गंभीर जखमी झाला आहे. सोमवारी दुपारी पावणेतीन वाजेच्या सुमारास झालेल्या अपघातामध्ये भाजलेल्या बंटी उर्फ विनय संजय धालवडे ( वय, २५ वर्षे रा. तांदळी दुमाला ता. श्रीगोंदा ) या तरुणाचा मृत्यू झाला आहे. श्रीगोंद्यावरुन तांदळी दुमालाकडे दिशेने निघालेली दुचाकीने ( क्र. एम एच १६ ए क्यू ७६९९ ) सिध्देश्वर मंदीर परिसरात वळणावरील संरक्षण कठड्यास जोरदार धडक दिली. धडक बसल्यानंतर दुचाकीने अचानक पेट घेतला. (पान ४ वर)

## क्रिकेटचा बॉल काढत असताना
# विजेच्या तारांना चिकटून १२ वर्षीय मुलाचा मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**जामखेड :** क्रिकेट खेळताना स्लॅपवरती गेलेला बॉल फ्लेक्सच्या लोखंडी पाईप ने काढत असताना घराजवळील मुख्य विज वाहीनीचा शॉक लागुन १२ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला. ही घटना जामखेड शहरातील खर्डा चौक येथील टेकाळे नगर या ठिकाणी घडली. विजेच्या तारांना चिकटून मृत्यू झालेली ही आठ दिवसांतील दुसरी घटना आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की जामखेड शहरातील खर्डा चौकातील टेकाळे नगर या ठिकाणी सोमवार दि ३० जुन रोजी सायंकाळी साडेपाच वाजता प्रणव प्रशांत टेकाळे, वय १२ वर्षे रा. टेकाळे नगर हा आपल्या मित्रांसोबत घराजवळ क्रीकेट खेळत होता. प्रणव टेकाळे याच्या घराजवळुनच मुख्य विद्युत वाहीनीच्या तारांची लाईन गेली आहे. क्रिकेट खेळत असताना बॉल स्लॅपवरती गेला या जवळच मुख्य विजेच्या तारा होत्या. प्रणव याने फ्लेक्सचा लोखंडी पाईप सदरचा बॉल काढण्यासाठी घेतला व बॉल काढत असताना त्याच्या हातातील पाईपचा या लाईटच्या तारांना धक्का लागला व त्याचा मृत्यू झाला. यावेळी त्याठिकाणी असलेले त्याचे चुलते नातेवाईकांनी त्याला तातडीने रुग्णालयात नेले मात्र पुर्वीच त्याचा मृत्यू झाला. जामखेड पोलीस स्टेशनला याची खबर मयूर टेकाळे यांनी दिल्याने जामखेड पोलिस ठाण्यात आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### ● आठ दिवसात तिघांचा मृत्यू

मागिल आठ दिवसापूर्वीच जामखेड तालुक्यातील बाळगव्हाण येथील उसाच्या शेतात खत टाकण्यासाठी गेलेल्या बाप- लेकाचा शेतातील खाली पडलेल्या विजेच्या तारांना चिकटून जागेवरच मृत्यू झाला होता. विद्युत महामंडळाच्या गलथान कारभारामुळे या दोघांचा मृत्यू झाला असल्याचे ग्रामस्थांन कडुन बोलले जात होते. यानंतर खर्डा- बाळगव्हाण येथील वायरमन यांना दोषी ठरवुन मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. विजेच्या धक्क्याने मृत्यू झाल्याची जामखेड तालुक्यातील येत्या आठ दिवसातील ही दुसरी घटना आहे.

### ● महावितरणचे अधिकारी मात्र अनभिज्ञ

शहरातील सदाफुले वस्ती येथील टेकाळे नगर येथे विजेचा तारेला स्पर्श होऊन प्रणव टेकाळे वय १२ वर्षीय या बालकाचा मृत्यू झाला आहे. हि घटना संपूर्ण शहरात पसरली होती. पण महावितरणच्या अधिकाऱ्यांना काहीही माहिती नव्हते. घटनेनंतर तीन तास झाले तरीही कोणीही महावितरणचे अधिकारी घटनास्थळी गेले नव्हते.




## महाराष्ट्रात वाहनांवर नवीन करप्रणाली लागू

**मुंबई :** महाराष्ट्रात वाहनांवरील करावर आजपासून मोठा बदल करण्यात आला आहे. यानुसार १ जुलै पासून नवीन वाहन कर प्रणाली लागू करण्यात आली आहे. यामुळे महागड्या वाहनांसोबतच सीएनजी, एलएनजीसह मालवाहू वाहनांच्या किंमती वाढणार आहेत. या नव्या कर सुधारणेमध्ये सर्व खासगी सीएनजी / एलपीजी वाहनांसाठी वन टाईम करात १% वाढ करण्यात येणार आहे. तसेच मोटार वाहन (एमव्ही) कराची कमाल मर्यादा २० लाख रुपयांवरून ३० लाख रुपये करण्यात आली आहे.

समजा एखाद्याने महाराष्ट्रात १० लाख रुपयांची सीएनजी कार घेतली तर त्याला आधी ७० हजार रुपये करापोटी द्यावे लागत होते. ते आता ८०००० रुपए द्यावे लागणार आहेत. तसेच जर २० लाखांची सीएनजी कार घेतली तर १.४ लाख रुपयांऐवजी १.६ लाख रुपये कर द्यावा लागणार आहे.



## संपादकीय

# राजकीय माघार

विधिमंडळ अधिवेशनाच्या तोंडावर महाराष्ट्राचे राजकारण काही प्रमाणात ढवळून निघाले, ते पहिलीपासून हिंदी या तिसऱ्या भाषेची सक्ती करण्याच्या मुद्यावर. सरकारने हा निर्णय घेतल्यानंतर त्याला झालेल्या विरोधाला उत्तरोत्तर धार येत गेली. हे जसजसे घडत गेले, तसतसे सरकारलाही नमते घ्यावे लागले. पण या विरोधाचा परमोत्कर्ष झाला तो उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या एकत्रित मोर्चाच्या नियोजनात. आता मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सक्तीसंदर्भातील सरकारी ठराव रद्द करीत असल्याचे जाहीर केले आणि सरकारी खाक्यानुसार समितीची घोषणा करून टाकली. एकीकडे समिती स्थापन करून आपण या विषयावरून पूर्ण माघार घेतली नसल्याचे दाखविणे आणि त्याचवेळी या संयुक्त मोर्चातील हवा काढून घेणे असे दुहेरी उद्दिष्ट महायुती सरकारने साधले.

विरोधकांचे प्रादेशिक मुद्यावर एकवटीकरण होणे हे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत परवडणारे नाही, हे सरकारच्या लक्षात आलेले दिसते. हिंदी सक्तीच्या मुद्यावर विविध शिक्षणतज्ज्ञ, मराठीप्रेमी यांनी आवाज उठवला, ही स्वागतार्ह बाब. सरकारी धोरणनिर्मितीच्या बाबतीत राजकारण्यांपुढे आपला काय निभाव लागणार, अशी हतबलता व्यक्त करीत न बसता ते जागरूक आणि सक्रिय राहिले, ही बाब आशा जागवणारी आहे. विरोधकही यानिमित्ताने एकत्र आले. पहिलीपासून हिंदी सक्तीविषयी राज्यात सर्वत्र जनक्षोभ दिसत होता. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार त्रिभाषा धोरण गळी उतरवण्याचा सरकारचा प्रयत्न असला तरी मराठीजनांना ही सक्ती आवडलेली दिसत नाही. हा प्रादेशिक अस्मितेचा मुद्दा बनण्याची शक्यता होती. त्यामुळेच अधिवेशनात याचे राजकारण होण्यापूर्वीच महायुती सरकारने पांढरे निशाण फडकावले. एका अर्थाने सरकारसाठी ही नाचक्की असली तरी हिंदी सक्तीच्या निर्णयाचे पाप हे महाविकास आघाडीचेच असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीसांनी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर याचे खापर फोडले आहे.

विधिमंडळाच्या सोमवारपासून सुरू होत असलेल्या पावसाळी अधिवेशनात इतरही अनेक विषय धसास लावण्याचा प्रयत्न विरोधक करतील. प्रचंड जनादेश घेवून आठ महिन्यांपूर्वी महायुती सरकार पुन्हा सत्तेवर आले. यावेळी मोठ्या यशाबरोबर जनमानसाच्या अपेक्षांची जबाबदारी मोठी आहे. ती पार पाडण्यासाठी सरकारचे प्रामाणिक प्रयत्न सुरु आहेत की नाही, हा खरा मुद्दा आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील नव्या सरकारचे गेल्या आठ महिन्यातील हे तिसरे अधिवेशन. सरकारस्थापनेच्या पहिल्या सहा महिन्यातच एका कॅबिनेट मंत्र्यावर प्रचंड आरोपामुळे राजीनामा द्यावा लागण्याची नामुष्की सरकारवर ओढवली. बलाढ्य बहुमत असतानाही तीन पक्षांचे सरकार चालवताना मात्र सरकारला कसरत करावी लागताना दिसते. त्यात नाशिक आणि रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाबाबत अद्याप तीन पक्षात एकमत झालेले नाही. अर्थमंत्र्यांकडून निधी वाटपात दुजाभाव होत असल्याची जाहीर नाराजी खुद्द सत्ताधारी पक्षाचे आमदार व्यक्त करत आहेत.

निधीवाटपाबाबत तर विरोधी आमदारांचा कुणी वाली उरलेला दिसत नाही. सत्ताधाऱ्यांसोबत नाही तर मग तुम्हाला निधी नाही, जणू असे नवे राजकीय समीकरण राज्यात तयार झालेले दिसते. सत्ताधाऱ्यांनी आता या सगळ्या राजकीय साठमारीतून थोडा वेळ काढून राज्यातील जनतेच्या खऱ्या प्रश्नांकडे लक्ष देण्याची वेळ आलेली आहे. या अधिवेशनात राज्य सरकार १२ विधेयके आणि ६ अध्यादेश मांडणार आहे. त्यापैकी एक वादग्रस्त 'महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक' या अधिवेशनात मांडले जाणार आहे. या विधेयकावर राज्यभरातून १२ हजारपेक्षा जास्त हरकती नोंदवल्या गेल्या. ''सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांची मुस्कटदाबी करणारे हे विधेयक आहे,विधेयकामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या हक्कावर गदा येईल,'' अशी टीका केली जात आहे. या विधेयकाच्या निमित्ताने उपस्थित होत असलेल्या अनेक गंभीर प्रश्नांचे सरकारला निराकरण करावे लागणार आहे.

नागपूर- गोवा शक्तिपीठ महामार्गासाठी जमीन अधिग्रहणामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे. सरकार या महामार्गासाठी ठाम असले तरी शेतकऱ्यांची नाराजी दूर करावी लागणार आहे. महायुतीच्या वचननाम्यात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा उल्लेख होता. ही आश्वासनपूर्ती योग्य वेळ आल्यावर होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले होते. ही वेळ म्हणजे नेमकी कोणती याबाबत स्पष्टता नाही. निवडणुकांमध्ये रेवड्या जाहीर करण्याची हौस सगळ्याच राजकीय पक्षांना असते. प्रत्यक्षात ती देण्याची वेळ आली की त्रेधातिरपिट उडते. 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'ला एक वर्ष पूर्ण होत आहे. पण या एका योजनेने किती विभागांचा निधी वळवला? किती गरीब मुलांच्या शिष्यवृत्त्यांचा निधी देण्याचा काळ लांबवला? याविषयी यापुढच्या काळात सरकारला सारासार विचार करावा लागणार आहे. याबाबतीत सरकारला भूमिका स्पष्ट करायला लावण्याचे काम विरोधकांनी करावे, अशी अपेक्षा असते. सभागृहात त्यांनी एकी टिकवली तर हे काम प्रभावीपणे होऊ शकेल.

# महाराजस्व अभियानातून ४२ लाभार्थींना विविध दाखल्यांचे वाटप



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** महसूल विभागाच्यावतीने सोनई मंडळामध्ये १०० दिवसीय छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानात उत्पन्न दाखला, रेशन कार्ड, जातीचे दाखले, पोट खराबा, वर्ग २ चे वर्ग १क रणे, जिवंत सातबारा, संजय गांधी योजना, मानीव बिनशेती, रहिवास प्रमाणपत्र, जमीन समस्या, संजय गांधी योजना आदी योजनेच्या ५१ लाभार्थ्यांना नेवासाचे तहसीलदार डॉ. संजय बिरादार यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. अध्यक्षस्थानी श्रावणबाळ माता-पिता संघाचे अध्यक्ष राजेंद्र निंबाळकर होते. नायब तहसीलदार संदिप चिंतामणी आणि पुरवठा निरीक्षक अधिकारी सुदर्शन दुर्योधन यावेळी उपस्थित होते.

डॉ. बिरादार म्हणाले की, निम्मी लोकसंख्या खेड्यामध्ये वास्तव्य करत असल्याने शासनाच्यावतीने तहसीलमधील प्रत्येक मंडळात वर्षातून चार वेळेस छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबवले जाणार आहे. या अभियात शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनेतील दाखले व लाभ देण्यात येणार आहे. सोनई मंडलात पहिल्यांदा शिबीर राबवत असून पुढे मोठे शिबिर घेतले जाईल. संदिप चिंतामणी म्हणाले की, सोनई मंडलामध्ये श्रावण बाळ योजना, संजय गांधी निराधार योजना, इंदिरा आवास योजना आदी योजनाचा

## सोनई मंडळामध्ये शिबिर

लाभ निराधार, विधवा, वृद्ध महिला यांनी घ्यावा. तसेच सध्या या योजेनातील १५ टक्के आधार लिंकचे काम बाकी आहे. ते पूर्ण कारण्यासाठी आम्ही काम करत आहोत. सेतू केंद्रामार्फत आधार लिंक करण्याचे आवाहन त्यांनी केले. दुर्योधन म्हणाले की, रेशन कार्डमार्फत धान्य मिळावे यासाठी अर्ज करावे. आम्ही आपली पात्रता आणि ४४ हजारखालील उत्पन्न असलेल्यांना लाभ देता येईल. नेवासा तालुक्यात १ लाख ९१ हजार चारशे लाभार्थी इतका कोटा मंजूर आहे. तो कोटा पूर्ण झाल्याने नवीन कोटा मिळत नाही. ९०० जणांचा सध्या कोटा प्रलंबित आहे.यावेळी सोनईचे मंडळाधिकारी प्रशांत कांबळे, तलाठी सतीश पवार, तलाठी दत्ता माकोने, सुभाष राख, अरुण दरंदले, पत्रकार विजय खंडागळे, अशोक भुसारी, संदीप दरदले, कोतवाल सुरेश साळवे, नानासाहेब साळवे आदी उपस्थित होते. सुभाष राख यांनी सूत्रसंचालन केले. आभार सतीश पवार यांनी मानले.

## संजीवनीच्या १४ विद्यार्थ्यांची विप्रो परी कंपनीत निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजचा ट्रेनिंग अँड प्लेसमेंट (टी अँड पी) विभाग वेगवेगळ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांशी संपर्क साधुन आपल्या विद्यार्थ्यांना नोकरी मिळवून देण्यासाठी कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करतो. अशाच प्रयत्नातुन विप्रो परी या बहुराष्ट्रीय कंपनीने संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या अंतिम वर्षातील १४ विद्यार्थ्यांची नोकरीसाठी आकर्षक पगारावर निवड केली आहे. संजीवनी इंजिनिअरींग कॉलेज दरवर्षी शेकडो विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये नोकऱ्या देऊन पालकांनी टाकलेला विश्वास सार्थ ठरवत आहे, अशी माहिती संजीवनी महाविद्यालयाने प्रसिध्दी पत्रकाद्वरे दिली आहे.

विप्रो परी (प्रिसिझन ऑटोमेशन अँड रोबोटिक्स इंडिया) या बहुराष्ट्रीय कंपनीने संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या मेकॅनिकल इंजिनिअरींगच्या अंतिम वर्षातील सहा, इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या तीन, इलेक्ट्रिकल इंजिनिअरींगच्या दोन व मेकॅट्रॉनिक्स इंजिनिअरींगच्या तीन विद्यार्थ्यांची त्यांच्या अंतिम निकालाअगोदरच नोकरीसाठी निवड केली आहे. यात जीवन आहेर, हर्षद गाडे, प्रसन्ना गोसावी, स्वरूप कुऱ्हे , गणेश साबळे, प्रथमेश वाडेकर, आश्रय दिवाण, स्नेहा पवार, गौरव शेळके, प्राजक्ता दहातोंडे, विशाल पुंड, मयुर दिवटे, पंकज निर्गुडे व नम्रता रक्ताटे यांचा समावेश आहे.

ग्रामीण भागातील मुला-मुलींना नोकरीच्या संधी मिळाव्यात, काहींनी उद्योजक बनावे, या हेतूने माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी १९८३ साली संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजची स्थापना केली. त्यांचा हेतु सफल होत आहे. कारण आजपावेतो हजारो अभियंते देश -परदेशात कार्यरत आहे तर काही नामांकित उद्योजक बनले. यामुळे ग्रामीण अर्थकारणाला बळकटी मिळाली आहे. संजीवनीचे अध्यक्ष नितिनदादा कोल्हे व मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले आहे.

## मुठे मित्रमंडळाच्यावतीने वारकऱ्यांना ९०० रेनकोटचे वाटप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगाव :** श्रीरामपूर तालुका भाजपा सरचिटणीस डॉ. शंकरराव मुठे मित्रमंडळाच्यावतीने पंढरपूरकडे जाणाऱ्या अहिल्यानगर ते करमाळा पालखी मार्गावर मुठेवाडगाव, कारेगाव, टाकळीभान येथील पायी पालखी दिंडी सोहळ्यातील वारकऱ्यांना रेनकोट वाटप करण्यात आले. श्रीसंत तुळशीराम महाराज पायी दिंडी मुठेवाडगाव, तसेच कारेगाव, टाकळीभान येथील पायी दिंडीचे भाविक भक्त पंढरपूरकडे जात असताना पालखी मार्गावर मिरजगाव येथे ९०० भाविकांना रेनकोटचे वाटप करण्यात आले. श्रीरामपूर पंचायत समितीचे माजी सभापती दीपक पटारे, पुणे येथील उद्योजक अविनाश कुलकर्णी, श्रीरामपूर बाजार समिती संचालक गिरिधर आसने, भाजपचे तालुका सरचिटणीस डॉ. शंकरराव मुठे यांच्या हस्ते हे वाटप करण्यात आले. यावेळी अनेक दिंड्यांना सदिच्छा भेटी देण्यात आल्या. यावेळी श्रीराम संघाचे रामेश्वर मुठे, मारुती जासूद, प्रदीप मुठे, जालिंदर मुठे, साईनाथ मुठे, ओम मुठे, वेदांत मुठे आदी उपस्थित होते.

## कुंभारी ग्रामपंचायतीच्यावतीने मागासवर्गीय कुटुंबांना मदतीचा हात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पोहेगाव :** कोपरगाव तालुक्यातील कुंभारी ग्रामपंचायतीने सामाजिक बांधिलकी जपत, आपल्या उत्पन्नातून ५ टक्के दिव्यांग कल्याण निधी व १५ टक्के मागासवर्गीय कल्याण निधी अंतर्गत गरजूंना मदतीचे वाटप केले. ६ दिव्यांग लाभार्थ्यांना स्टँड फॅन, १४ अनुसूचित जातीतील कुटुंबांना किराणा किटचे वितरण करण्यात आले.

सरपंच देवयानी घुले, उपसरपंच कविता निळकंठ, काळे कारखान्याचे संचालक, माजी सरपंच प्रशांत घुले, माजी सरपंच श्रीधर कदम, अर्जुन घुले चंद्रभान बढे, भानुदास घुले, वसंत घुले, ललित निळकंठ, पुरुषोत्तम महाजन, भास्कर भारती, कारभारी व्होरे, ग्रामपंचायत सदस्य दिलीप ठाणगे, रामराव चंदनशिव, राहुल पवार, संजय ठाणगे, अनिकेत कदम, नाना पवार ग्रामपंचायत सदस्या ज्योती आहिरे, रंजना गायकवाड, मनिषा घुले, वैशाली बढे, रंजना वारुळे, अभिजीत चकोर, विकास वाघ, सिद्धांत घुले, आदित्य महाजन, ग्रामपंचायत अधिकारी रतन कहार, ग्रामपंचायत कर्मचारी निता कदम, रवींद्र व्होरे, शंकर चंदनशिव, पंचायत सदस्यगण, अधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते. कुंभारी ग्रामपंचायत समाजाभिमुख प्रशासनाचे उत्तम उदाहरण ठरत आहे, प्रशांत घुले यांनी सांगितले. सरपंच देवयानी घुले यांनी मनोगत व्यक्त केले. आभार रतन कहार यांनी मानले.

## भोर, उपाध्ये, फासाटे यांना विश्वलक्ष्मीचे पुरस्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव :** येथील विश्वलक्ष्मी ग्रामीण प्रतिष्ठानचे २०२५ चे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. प्राचार्य शिवाजीराव भोर यांना स्व. ॲड. रावसाहेब शिंदे स्मृती राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्कार, वाचन संस्कृती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. बाबुराव उपाध्ये यांना डॉ. र.बा. मंचरकर साहित्यसेवा पुरस्कार आणि कवयित्री संगीताताई फासाटे/ कटारे यांना स्व. पुष्पाताई सुखदेव सुकळे स्मृती पुरस्कार जाहीर झाला असल्याची माहिती विश्वलक्ष्मी ग्रामीण प्रतिष्ठानचे संस्थापक सचिव सुखदेव सुकळे यांनी दिली.

३० जानेवारी २०१८ पासून सुरू झालेल्या विश्वलक्ष्मी ग्रामीण प्रतिष्ठानचे विविध प्रेरणादायी सेवाभावी पुरस्कार, सामाजिक प्रबोधनपर व्याख्याने, पुस्तक निर्मिती, प्रकाशन सोहळे, दुर्बल, निराधार विद्यार्थी यांना गणवेश, वह्या, पुस्तके वाटप, गरजूंना मदत, साहित्य निर्मिती, प्रकाशने अशा विविध स्वरूपाचे सेवाकार्य करत आहे. ॲड्. रावसाहेब यांची ९७ वी जयंती, स्व. पुष्पाताई सुखदेव सुकळे यांचा तृतीय पुण्यस्मरणदिनानिमित्त सुखदेव सुकळे लिखित ज्ञानदीपफ पुस्तकाचा प्रकाशन सोहळा व परुस्कार वितरण १० जुलैला२सकाळी१० वाजता मेनरोड आगाशे सभागृहात होणार आहे. डी. एस. वडजेबापू, माजी प्राचार्य रघुनाथराव आगळे प्राचार्य टी ई. शेळके, डॉ. राजीव शिंदे उपस्थिती राहतील.

## गुरुदेव आश्रमात शुक्रवारपासून श्रीमद् भागवत कथा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वडाळा महादेव :** श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील नेवासा रस्त्यावरील गुरुदेव डॉ. काटेस्वामी आश्रमात गुरुपौर्णिमा महोत्सवानिमित्त श्रीमद् भागवत कथा आयोजित करण्यात आली आहे. शुक्रवारपासून (दि. ४) कथा प्रारंभ होणार आहे. भागवतोत्तम लक्ष्मीकांत महाराज पाथरीकर कथा निरूपण करणार आहेत. सकाळी ७ ते १० संहिता वाचन होणार असून दुपारी २.३० ते ५.३० पर्यंत कथा निरूपण होणार आहे. ९ जुलैला सकाळी गोमाता पूजन, गोवत्सपूजन, श्रीमद् भागवत दशमस्कंध हवन संपन्न होणार आह. १० जुलैला रोजी सकाळी कथा सांगता व आरती व श्री गुरुपादुका पालखी सोहळा, परमपूज्य गुरुदेव महापादुका तुलादान, भजन, प्रवचन व महाआरती व नंतर महाप्रसाद होणार आहे. भक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन गुरुदेव भक्त मंडळातर्फे करण्यात आले आहे.

## सहकार पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडील निर्देशानुसार सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील सहकार पुरस्कारासाठी पात्र सहकारी संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. या संदर्भात जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर मंगेश सुरवसे व सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, श्रीरामपूर रवि गडेकर यांनी आवाहन केले आहे की, श्रीरामपूर तालुक्यातील सर्व सहकारी संस्थांनी आपले प्रस्ताव आवश्यक कागदपत्रांसह सहाय्यक निबंधक कार्यालयात दि. १८ जुलै २०२५ पर्यंत सादर करावेत. सदर प्रस्ताव शासनाने निश्चित केलेल्या निकषांनुसार व आवश्यक कागदपत्रांसह सादर करणे अनिवार्य आहे. अपूर्ण प्रस्ताव ग्राह्य धरले जाणार नाहीत. प्राप्त प्रस्तावांची छाननी समितीमार्फत करण्यात येईल व अंतिम निर्णय शासन स्तरावर घेतला जाईल. सर्व सहकारी संस्थांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक सुरवसे व सहाय्यक निबंधक गडेकर यांनी केले आहे.

## समाधान शिबिरात १३६ दाखल्यांचे वाटप



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्रीशिर्डी :** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानांतर्गत कोपरगाव मंडळाधिकारी कार्यालयात आयोजित शिबिरात १३६ महसूल दाखल्यांचे तहसीलदार महेश सावंत यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. शिबिरात शेतकरी, महिला, विद्यार्थी तसेच संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांना महसूलविषयक विविध दाखले व लाभ प्रदान करण्यात आले.

शिबिरास शिर्डी उपविभागीय अधिकारी माणिक आहेर व कोपरगाव तहसीलदार महेश सावंत यांनी मार्गदर्शन केले. शिबिरात उत्पन्न दाखले ४०, जातीचे दाखले २२, जिवंत ७/१२ मोहिमेंतर्गत वारस फेरफार ८, रेशनकार्ड वाटप २१, ७/१२ व ८ अ उतारे ४५, संजय गांधी व श्रावण बाळ योजनेचे लाभार्थी १८ अशा एकूण १३६ दाखल्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी निवासी नायब तहसीलदार प्रफुल्लिता सातपुते, मंडळाधिकारी मच्छिंद्र पोकळे, ग्राम महसूल अधिकारी जगदीश शिरसाठ (कोपरगाव), अश्विनी निर्मळ (येसगाव), वैशाली दुकळे (मुर्शतपूर), वाल्मिक पवार (शिंगणापूर) तसेच महसूल सेवक व कर्मचारी उपस्थित होते.

## केशव गोविंद बन शाळेला संगणक भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** रोटरी क्लब ऑफ आणि इनरव्हील क्लब ऑफ श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, केशव गोविंद बन येथे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी संगणक (कॉम्प्युटर) प्रदान करण्यात आला.

तंत्रज्ञानाच्या युगात डिजिटल शिक्षणाची गरज ओळखून हा उपक्रम राबविण्यात आला. या संगणकामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना संगणक साक्षरतेचे धडे मिळतील, तसेच त्यांचे शिकणे अधिक प्रभावी आणि आनंददायी होईल, असा विश्वास शाळेच्या मुख्याध्यापकांनी व्यक्त केला. याप्रसंगी रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. अजित घोगरे, संचालक उल्हास धुमाळ, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा डॉ. शीतल घोगरे, सदस्या कांचन शिरसाठ, सरपंच प्रणाली भगत, शाळा समिती अध्यक्ष विलास भगत, ज्ञानदेवराव गायकवाड, बी. एम. पुजारी, अदिती गायकवाड, प्रतीक्षा गायकवाड , शाळेचे शिक्षक मुख्याध्यापक कदम, जठाड, सय्यद, खरात, जाधव, कोळपकर, शुभांगी भगत, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते. या उपक्रमाबद्दल शाळेच्यावतीने क्लबच्या पदाधिकाऱ्यांचे आभार मानण्यात आले.




## घरेलू महिला कामगारांच्या कार्यशाळेत विविध प्रश्नांवर चर्चा

### युवाग्राम विकास संस्थेचा उपक्रम




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** घरकामगार हे समाजातील एका मोठ्या उत्पादकवर्गाला सेवा पुरवतात. या प्रक्रियेत त्यांना जगण्यासाठी उत्पन्न मिळते. असंघटित क्षेत्रातील अतिशय महत्त्वाचा वर्ग असलेल्या घरकामगार महिलांना अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते. शिक्षणाचा अभाव, आरोग्याच्या प्रचंड समस्या, कामाच्या ठिकाणी असुरक्षितता, कामाची अनिश्चितता आणि अत्यल्प वेतन अशा अनेक समस्यांना तोंड देणाऱ्या घरकामगार स्त्रिया आजही सामाजिक सुरक्षा पासून वंचित आहेत. त्यासाठी प्रा. संभाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली युवाग्राम विकास संस्था गेल्या दोन वर्षापासून कार्यरत आहे. त्यांच्या कामाला आमचे सहकार्य व पाठबळ राहील, असे प्रतिपादन स्नेहालय संस्थेच्या बालभवन प्रकल्पाचे संचालक हनीफ शेख यांनी केले.

श्रीरामपूर युवाग्राम विकास संस्था व कोरो इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीरामपूर येथे मघरेलू महिला कामगार संघटना कार्यशाळाफ घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी पत्रकार राजेंद्र वाडेकर होते. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष संभाजी पवार, संचालक फिरोज शेख, अमोल सोनवणे, शायिस्ता शेख, अनिता शेलार, आदित्य पवार उपस्थित होते.

पवार म्हणाले की, कोणतेही काम श्रेष्ठ दर्जाचे किंवा हलक्या प्रतीचे नसून, सर्व समान व एकमेकास पूरक आहे. हे जरी खरे असले तरी घरकाम करणाऱ्या घरेलू कामगार महिलांना समाजात फारच उपेक्षेने वागवले जाते. घरेलू कामगार महिलामध्ये एकजूट नसल्यामुळे ते आपल्या हक्काविषयी आणि अधिकाराविषयी जागृत नाही. त्यामुळे ज्यांचे प्रश्न, त्यांचे नेतृत्व आणि त्यांचाच आवाज या मुद्द्याला घेऊन संघटनात्मक बांधणी केली तर प्रश्न सुटण्यास मदत होईल.

वाडेकर म्हणाले की, घरकामगार कोणाचे उपकार घेत नाहीत तर तेही श्रमिक आहेत. त्यांचा आदर, त्यांच्या हक्काचे रक्षण आणि त्यांच्या जीवनमानाचा विकास हा समाजाचा आणि शासनाचा दोघांच्या जबाबदारीचा भाग आहे. स्वागत शायिस्ता शेख, आभार अनिता शेलार यांनी मानले. सूत्रसंचलन अमोल सोनवणे यांनी केले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Bahasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, Emal ID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818

# मातृशक्तीच्या माध्यमातून कुटुंबियांना जोडण्यासाठी प्रयत्न : डॉ. यादव

## शिर्डी येथे अखिल भारतीय जनप्रतिनिधींची बैठक



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : मातृशक्तीला केंद्रीभूत मानून समाजातील हजारो कुटूंबियांना संस्कार आणि सामर्थ्यांतून जोडण्याचे महत्वपूर्ण कार्य विश्वमांगल्य सभेच्या माध्यमातून करण्याचा संकल्प शिर्डी येथील अखिल भारतीय जनप्रतिनिधी सभेत करण्यात आला. दोन दिवसांच्या बैठकीत वर्षभरातील कार्यक्रम आणि संघटन कार्यक्रमाची योजना निश्चित करण्यात आली असल्याची माहीती विश्व मांगल्य संघटनेच्या अखिल भारतीय संयोजिका डॉ. अनुराधा यादव यांनी दिली.

विश्व मांगल्य सभेच्या अखिल भारतीय जनप्रतिनिधींची दोन दिवसीय बैठक शिर्डी येथे संपन्न झाली. या बैठकीस देशभरातील १३ प्रांतामधील महिला जनप्रतिनिधी उपस्थित होत्या. या परिषदेचे उदघाटन विश्व मांगल्य सभेचे केंद्रीय परामर्शदाता प्रशांत हरतालकर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी राष्ट्रीय सहसंघटन मंत्री वृषाली जोशी, सहसंघटन मंत्री पूजा देशमुख, गायत्री लोमटे, अखिल भारतीय संपर्क प्रमुख शुभांगी मेंढे, माजी केंद्रीय राज्यमंत्री मीनाक्षी लेखी, उत्तर महाराष्ट्राच्या संयोजिकाधनश्री विखे उपस्थित होत्या.

बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना डॉ. यादव म्हणाल्या की, देशामध्ये ५८ लाख जनप्रतिनिधींचे परिवार आहेत. यामध्ये संसद सदस्य, विधानसभा सदस्य, जिल्हा परिषद पंचायत समिती सदस्य, नगरसेवक अशा लोकप्रतिनिधींच्या कुटूंबियाचा समावेश आहे. जनप्रतिनिधींचे कुटूंब हे लाखो लोकांचे असते. समाजाकरिता ही कुटूंब प्रेरणास्थान व्हावेत या उद्देशाने आम्ही कार्य करीत आहोत. कुटुंबातील मातृशक्तीला केंद्रीभूत मानून समाजात होणारे बदल अभ्यासून त्यादृष्टीने प्रत्येक कुटुंबात संस्कार देणारी माता निर्माण करण्याचे कार्य आम्ही येणाऱ्या काळात करणार आहोत. यासाठी लाखो परिवार जोडण्यासाठी संघटन मजबूत करण्याचा संकल्प आणि यासाठी वर्षभरातील कार्यक्रमाच्या दोन दिवसांच्या सभेत निश्चित करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

पूजा देशमुख यांनी सांगितले की, समाजातील असंख्य परिवार जोडण्यासाठी छोटे रोपटे आम्ही लावले आहे. त्याचा वटवृक्ष करण्याचा संकल्प आम्ही केला आहे. प्रत्येक कुटुंबात चांगले संस्कार आम्हाला द्यायचे आहे. कुटुंबाबरोबरच जनप्रतिनिधींचे कार्यक्षेत्रही सांभाळायचे आहे. त्यादृष्टीनेच भविष्यात संघटनात्मक कार्य करणार आहे.

धनश्री विखे म्हणाल्या की, ४ वर्षांनी ही सभा शिर्डी येथे घेण्याची संधी मिळाली असल्याचा अभिमान आहे. दोन दिवसांच्या बैठकीमध्ये भारतीय संस्कृतीला पुढे घेऊन जाण्याच्या दृष्टीने असंख्य परिवारांना संस्कृतीचे ज्ञान देण्याचे कर्तव्य आम्ही करणार आहोत. पुढची पिढी घडविण्यामध्ये मातृशक्तीचा वाटा खूप मोठा असतो. त्यावरच लक्ष केंद्रीत करुन, आगामी काळात कार्य करण्याचा निर्धार या जनप्रतिनिधी सभेत झाला असल्याचे त्यांनी सांगितले.

## द • ख • ल

### वसंतराव नाईक जयंतीनिमित्त चणेगाव येथे वृक्षारोपण



**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील चणेगाव येथे हरित क्रांतीचे शिल्पकार वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त ग्रामीण कृषी कार्यानुभवतंर्गत श्रमशक्ती कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण करून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. गावातील सार्वजनिक ठिकाणी फळझाडे, छायादायक व औषधी वृक्षांची लागवड केली. उपक्रमात ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन प्राचार्य डॉ. ए. एल. हारदे आणि कार्यक्रम अधिकारी प्रा. बी. डी. तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. विद्यार्थ्यांनी लावलेली झाडे दत्तक घेऊन त्यांची निगा राखण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. विद्यार्थ्यांनी घेतलेला उपक्रम चाणेगावसारख्या ग्रामीण भागात पर्यावरण संवर्धनाची चळवळ उभी करण्यास मदत करेल, अशा भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या.

### स्मृतीगंध : माझा जीवन प्रवास कादंबरीचे प्रकाशन



**बेलापूर** : बेलापूरचे मूळ रहिवासी असलेले साहित्यिक डॉ. मुजफ्फर शेख यांच्या स्मृतीगंधः माझा जीवनप्रवास या कादंबरीचा प्रकाशन सोहळा महाराष्ट्र राज्य मराठी विभागाचे सचिव किरण कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली तसेच टाकळीमियाचे डॉ. आर. वाय. पठाण यांच्याकुन्या शहनाज व परवीन यांच्या हस्ते झाला. डॉ. शेख यांची अनेक पुस्तके, काव्यसंग्रह मराठी, हिंदी व इंग्रजीत प्रकाशित झाली आहेत. डॉ. शेख यांनी राहुरी तालुक्यातील टाकळिमिया येथील त्यांचे सासरे डॉ. आर. वाय.पठाण यांचे जीवनावर आधारीत स्मृतिगंधःमाझा जीवनप्रवास ही कादंबरी पुणे येथे सुनिधी प्रकाशनमार्फत प्रकाशित केली. कार्यक्रमास डॉ. राजश्री कुलकर्णी, डॉ. शिरीष चिंधडे, कल्पना भांगे, प्रभा सोनवणे, प्रकाशक अविनाश काळे, डॉ. युनुस इनामदार, डॉ.अनीस इनामदार उपस्थित होते.

### लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्टच्यावतीने सायकल वाटप




**शिर्डी** : साईभक्त लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्टच्यावतीने ग्रामीण भागातून शहरात येणाऱ्या गुणवंत गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप करण्यात आले. ट्रस्टचे अध्यक्ष अरुणराव शिंदे- गायकवाड यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी संगीता गायकवाड, साईराज गायकवाड, रमेश गोंदकर, संग्राम कोते, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस- दीपक गोंदकर, निलेश शिंदे, सचिन गोंदकर, शंतनू सुगवेकर, अनिल वाल्हेकर, संदीप नागरे, अशोक गायके, शिवा गोंदकर अभिजीत गोंदकर, अजित जगताप, राहुल फुंडे, संकेत बोराडे, अमोल सुपेकर, गंगाधर वाघ उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी ट्रस्टच्या कार्याच कौतुक केले. शिक्षणासठी होणारी गैरसोय दूर केल्याने पालकांच्या व विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील समाधान हिच आमच्या कामाची पोहच पावती आहे.

### सोनगाव सात्रळ चर्चमध्ये येशू हृदय यात्रा संपन्न

**झरेकाठी** : राहुरी तालुक्यातील सोनगाव सात्रळ चर्चमध्ये येशू हृदय यात्रा भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. यात्रेच्या तीन दिवस त्रिदिन भक्तीचे आयोजन करण्यात आले होते. या तीन दिवसात फा. आल्वीन मिस्किटा यांच्या प्रवचनाचा भाविकांनी लाभ घेतला. यात्रेच्या दिवशी पेठेतून येशू हृदय प्रतिमेची मिरवणूक होऊन सायंकाळी टिळकनगर येथील फा. पिटर डिसोजा यांनी यात्रेत प्रवचन करून मिस्सा अर्पण केला. याप्रसंगी प्रमुख धर्मगुरू फा. रॉनी परेरा, फा. विल्सन रुमाव, फा. अश्ली डीमोंटी, फा. जस्टीन व इतर धर्मग्रामातील बहुसंख्य फादर, सिस्टर्स, पॅरिश कौन्सिल मेंबर व नागरिक उपस्थित होते.

# निवडणूक प्रक्रिया शांततेत आणि निष्पक्ष पार पाडावी : सावंत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : निवडणूक प्रक्रिया ही लोकशाहीचा पाया आहे. सर्व पक्षांनी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी नियमांचे काटेकोर पालन करून निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण आणि निष्पक्षपणे पार पाडावी, असे उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी किरण सावंत सावंतयांनी सांगितलेमतदान केंद्रांवर गोंधळ टाळण्यासाठी आणि मतदारांना त्रास होऊ नये यासाठी पक्षांनी बूथ लेवल एजंटची नेमणूक करावी असे आवाहन त्यांनी केले.

आगामी नगरपरिषद, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी किरण सावंत यांनी तालुक्यातील राजकीय पक्षांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीत निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निर्भय आणि नियमानुसार पार पाडण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. बैठकीसाठी तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, निवासी नायब तहसीलदार राजेश पऊळ, निवडणूक नायब तहसीलदार हेमलता वाकडे, उपमुख्याधिकारी महेंद्र तापकिरे, महसूल सहायक उत्तम रासकर, ओम खुपसे, संदीप पाळंदे, नगरपरिषदेचे अरुण लांडे उपस्थित होते.

सावंत म्हणाले की, १ जानेवारी, १ एप्रिल, १ जुलै व १ ऑक्टोबर २०२४ या तारखेस १८ वय वर्ष पूर्ण होणारे व झालेल्या व्यक्तींना मतदार नोंदणी करता येणार आहे. प्रतिष्टीत मतदार, आजी-माजी खासदार, आमदार, जिल्हा परिषद, पंचायत समिती सभापती, सदस्य, ग्रामपंचायत सरपंच, वकील, इंजिनियर, दिव्यांग आदी मतदारांची नावे मतदार यादीत तपासा. याकामी काही अडचण असल्यास तत्काळ निवडणूक शाखेत संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले.

या बैठकीला काँग्रेस, बहुजन समाज पक्ष, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि इतर स्थानिक पक्ष व आघाडीचेचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत पक्षांनी निवडणूक प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींवर चर्चा झाली. काही पक्षांनी मतदार यादीतील त्रुटींवर प्रश्न उपस्थित केले, ज्यावर प्रांताधिकारी यांनी तात्काळ कार्यवाहीचे आश्वासन दिले.

## राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक



निवडणूक प्रक्रिया ही केवळ प्रशासकीय जबाबदारी नाही, तर राष्ट्रीय कर्तव्य आहे. सर्वांनी एकत्र येऊन ही प्रक्रिया यशस्वी करूया. मागील लोकसभा व विधानसभा निवडणुकांचा अनुभव आणि प्रांताधिकारी किरण सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका यशस्वी पार पाडू.

**- मिलिंदकुमार वाघ, तहसीलदार**

# आ. विठ्ठलराव लंघे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बालाजी देडगाव** : येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा देडगाव येथे आमदार विठ्ठलराव लंघे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण व मुलांना खाऊचे वाटप करण्यात आले.

आमदार विठ्ठलराव लंघे पाटील मित्र मंडळाच्यावतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रास्ताविक ज्येष्ठ शिक्षक भाऊसाहेब सावंत यांनी केले. सावंत म्हणाले की, वृक्षारोपण ही काळाची गरज आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने आपापल्या घरी आपल्या आईच्या नावाने एक झाड लावावे. मित्रमंडळाचे मच्छिंद्र मुंगसे, ज्येष्ठ पत्रकार बन्सीभाऊ एडके यांनी मनोगत व्यक्त केले. मुंगसे, निलेश कोकरे, भाजपचे आकाश चेडे, अरुण वांढेकर, गंगाराम तांबे, गोकुळ वांढेकर, विठ्ठल काळे, मुख्याध्यापक सतीशकुमार भोसले, बथुवेल हिवाळे, धामणे, कदम आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# महिलांनी कायद्याविषयी जागृत व्हावे : न्यायाधीश काटकर



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : महिलांनी कायदे जाणून घेणे गरजेचे आहे. एखाद्या महिलेवर अन्याय होत असेल तर त्या महिलेने तो सहन न करता कायद्याचा आधार घेऊन न्याय मिळवला पाहिजे. आर्थिक शोषण , शारीरिक शोषण, कौटुंबिक अत्याचार, बलात्कार , विनयभंग अशा अनेकप्रकारे महिलांवर अन्याय होत असतो. परंतु महिलांना कायदेविषयक माहिती नसल्याने महिला अन्याय सहन करतात. परंतु अशा प्रकारच्या प्रत्येक अन्यायाला कायदेशीर मार्ग असून महिला न्याय मिळवू शकतात, असे प्रतिपादन न्यायाधीश व्ही.एन. काटकर यांनी केले.

तालुक्यातील भैरवनाथनगर ग्रामपंचायत, तालुका विधी सेवा समिती आणि श्रीरामपूर वकील संघ यांच्यावतीने कायदेविषयक जनजागृती शिबिर झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. भैरवनाथनगरच्या सरपंच दीपाली फरगडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

काटकर म्हणाल्या की, जसा महिलांवर अन्याय होतो तसा पुरुषांवरसुद्धा होत असतो. जशी महिला न्याय मागण्यासाठी कायदेशीर मार्गाचा अवलंब करू शकते तशाच पद्धतीने पुरुषसुद्धा न्याय मागू शकतो. वकील संघाच्या सदस्य ॲड. चित्रा कापसे यांनी घरगुती हिंसाचारापासून महिलाचं संरक्षण कायदा याविषयी माहिती सांगितली. सदस्य ॲड. रेश्मा तांबोळी यांनीही कायदेविषयक माहिती सांगितली. सरपंच फरगडे म्हणाल्या की, कायदेविषयक जनजागृती शिबीर आयोजित होणे आवश्यक आहे. जेणेकरून महिलांना कायद्याविषयी माहिती होईल. महिलांवरील होणारे अन्याय अत्याचार कमी होतील

सूत्रसंचालन ॲड. मुमताज बागवान यांनी केले. उपसरपंच चंद्रभागा काळे, ग्रामपंचायत सदस्य कांता शेळके, सीमा शिंदे, बेबी फरगडे, पांडुरंग लबडे, सौरभ गवारे, सुभाष म्हस्के, शेरे एस. के. गायकवाड सी.व्ही, ॲड. चंचल सावंत, महिला पोलीस नाईक सविता उंदरे, पोलीस कॉन्स्टेबल सतीश खरात, संगीता धिवर , यास्मिन शेख, अनिता गायधने, तृप्ती जगदाळे, प्रफुल्ला पटारे, रचना फासाटे, शुभांगी करवीर ,विठ्ठल वैद्य, आदींसह भैरवनाथनगर हद्दीतील बचतगटाच्या महिला हजर होत्या.

# काटेरी झुडुपात अडकलेल्या रस्त्याची दयनीय अवस्था



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : शहरालगत असलेल्या एस.एस.जी.एम. महाविद्यालयासमोरील मुख्य रस्त्याची सध्या अत्यंत दयनीय अवस्था झाली असून या मार्गाने ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांना रोजच्याच प्रवासात त्रास सहन करावा लागत आहे. दुतर्फा वाढलेली काटेरी झुडुपे, खड्ड्यांनी भरलेला रस्ता आणि अरुंद जागा यामुळे विद्यार्थ्यांची सुरक्षितता धोक्यात आली आहे.

या मार्गावरून बसस्थानकाकडे दररोज पायी प्रवास करणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांसाठी ही परिस्थिती जीवघेणी ठरत आहे. मोठ्या वाहनांची वर्दळ असताना चालणाऱ्यांना रस्त्यावरून बाजूला होण्यासाठी जागाच उपलब्ध नसते. गाड्यांच्या टकरीने अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. काही वेळा अपघात घडल्याच्या घटना घडल्या आहेत. शैक्षणिकदृष्ट्या प्रगत शहरात अशा प्रकारची अडचण असणे अत्यंत दुर्दैवी आहे, असे पालकांनी सांगितले. या रस्त्याचा विकास, स्वच्छता व काटेरी झुडुपांचे तातडीने निर्मूलन होणे गरजेचे असल्याचे विद्यार्थ्यांनीही सांगितले. स्थानिक नागरिक, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि पालकवर्गाने प्रशासनाला तातडीने या रस्त्याची डागडुजी, झाडाझुडुपांची छाटणी आणि योग्य दिव्यांची व्यवस्था करण्याची मागणी केली आहे. स्थानिक प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी मागणी विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी केली आहे.

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः जन्म-मृत्यु एसआर/६६/२०२५
नेवासा दिनांक ०१/०७/२०२५

## जाहीर प्रगटन

अर्जदार श्री श्रीम- ज्ञानेश्वर साहेबराव नवथर, रा. पिंप्रीशहाली, ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन अर्जदार यांनी कै. सखुबाई नारायण नवथर यांचा महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यु नोंद गावी जन्म मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालील प्रमाणे मृत्यू नोंद होणे बाबत नमूद केलेले आहे. अ.क्र.- १, जन्म-मृत्यु नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-कै. सखुबाई नारायण नवथर, गावाचे नाव-पिंप्रीशहाली, मृत्यु दिनांक- ३०/०८/२०१८

करिता या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यु नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## जाहीर प्रगटन

क्रमांकः कावि/फौजदारी/६५९/२०२५
तहसिल कार्यालय नेवासा तालुका नेवासा, जि. अहिल्यानगर
दिनांकः ३०/०६/२०२५

अर्जदार-श्री. शिवाजी विठ्ठल खंडागळे रा. वांजोळी, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर यांनी त्यांची आई कै. रखमाबाई विठ्ठल खंडागळे हे दिनांक २१/०८/२०२३ रोजी मयत झालेले आहे. त्यांना न्यायालयीन कामकाजासाठी व शासकीय रक्कम काढणेसाठी Heirship Certificate मिळण्यासाठी या कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे. सदरच्या अर्जात त्यांना खालील प्रमाणे वारस असल्याचे नमुद केलेले आहे.

| अ.क्र. | वारसांची नावे | वय आधार कार्ड नुसार | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १. | विठ्ठल काशिनाथ खंडागळे | ७१ | मुलगा |
| २. | शिवाजी विठ्ठल खंडागळे | ३७ | पती |
| ३. | व्दारका शंकर खंडागळे | ४७ | सुन |
| ४. | दिनेश शंकर खंडागळे | २१ | नातू |
| ५. | संकेत शंकर खंडागळे | १७ | नातू |
| ६. | सुनिता बाबासाहेब गांधले | ४७ | मुलगी |

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील Heirship Certificate बाबतचे कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदारास Heirship Certificate निर्गमित करण्यात येईल.

**तहसीलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

# आदिवासी शेतकऱ्यांना बियाणे वाटप




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : महात्मा फुले कृषी विद्यापीठांतर्गत बियाणे विभागाच्यावतीने इन्शी (ता. कळवण, जि. नाशिक) येथे अनुसूचित जमाती (ढडझ) अनुदानातून आदिवासी शेतकरी बांधवांना खरीप हंगामातील विद्यापीठ संशोधीत सोयाबीन पिकाचे फुले किमया व दूर्वा या वाणाचे मोफत बियाणे वाटप करण्यात आले. कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचे नेतृत्वाखाली संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली व बियाणे विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नितीन दानवले यांच्या नियोजनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. इन्शी गावचे सरपंच बाळासाहेब पवार, पोलीस पाटील तुळशीराम पवार, गोळाखोल गावचे सरपंच प्रभाकर गायकवाड, पोलीस पाटील रामदास पवार, कृषी सहाय्यक अमोल पाटोळे उपस्थित होते.

प्रास्ताविक विपणन अधिकारी डॉ. दिलीप ठाकरे यांनी केले. उपस्थित शेतकऱ्यांना डॉ. अविनाश कर्जुले यांनी बीज प्रक्रिया, डॉ. के. सी. गागरे सोयाबीन वाणांची व डॉ. नितीन दानवले यांनी आधुनिक सोयाबीन लागवड तंत्रज्ञानाची संपूर्ण माहिती दिली. यावेळी एकूण ४४३ लाभार्थी शेतकर्यांना प्रतिएकर क्षेत्राचे २६ किलो प्रतिबॅगप्रमाणे एकूण ११ क्विंटल ५१८ किलो सोयाबीन बियाणे वाटप करण्यात आले. गावचे सरपंच व स्थानिक पत्रकार यांनी विद्यापीठाचे कुलगुरू, संशोधन संचालक व प्रमुख शास्त्रज्ञ बियाणे यांचे आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. नितीन दानवले यांचे नेतृत्वाखाली भूषण हंडाळ, संदीप कोकाटे व बियाणे विभागातील अधिकारी कर्मचारी यांनी चांगले नियोजन केले. याप्रसंगी लाभार्थी शेतकरी उपस्थित होते.

## नगरपंचायत कार्यालय, कर्जत

ता.कर्जत, जि.अहिल्यानगर
फोन नं. ०२४८९
न.प.कार्या/जा.क्र.१४५८/२०२५ दि.०१/०७/२०२५

## निविदा सूचना

मा.मुख्याधिकारी, नगरपंचायत कर्जत, ता.कर्जत, जि.अ.नगर हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील कंत्राटदारांकडून कामाची ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | विभागाचे तपशील | निविदा फॉर्म फी | निविदा बयाणा रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | कर्जत नगरपंचायत हद्दीतील आरोग्य विभागामध्ये घनकचरा व्यवस्थापन पाणीपुरवठा विभाग विद्युत विभाग व अग्निशामक विभागामध्ये सन २०२५-२६ करिता किमान वेतन कायद्यानुसार कामगार पुरवठा करणेकामी अनुभवी अभिकर्त्यांची नियुक्ती करण्यासाठी निविदा मागविण्यात येत आहेत. | २५००/- | २५०००/- | १ वर्ष |

| अ.क्र. | नगरपंचायत प्रक्रिया | दिनांकापासून | दिनांकापर्यंत |
|---|---|---|---|
| १ | ऑनलाईन निविदा विक्री | ०२/०७/२०२५ (सकाळ १०.०० पासून) | १६/०७/२०२५ (सायं. ६.०० पर्यंत) |
| २. | ऑनलाईन निविदा स्वीकृती | ०२/०७/२०२५ (सकाळ १०.०० पासून) | १६/०७/२०२५ (सायं. ६.०० पर्यंत) |
| ३. | मूळ कागदपत्र सादर करणे | १७/०७/२०२५ (सकाळ १०.०० पासून) | १७/०७/२०२५ (सायं. ६.०० पर्यंत) |

१. निविदेच्या अटी व सविस्तर ई-निविदा सूचना शासनाच्या www.mahatender.gvo.in या संकेत स्थळावरून डाऊनलोड करता येतील. २. कामाच्या सर्व अटी शर्ती निविदा संचासोबत उपलब्ध आहेत. ३. कोणतीही निविदा स्विकारणे नाकारणे अथवा रद्द करणे या बाबतचे सर्व अधिकार नगरपंचायतीस राहतील.

**नगराध्यक्षा** कर्जत नगरपंचायत कर्जत
**उपनगराध्यक्ष** कर्जत नगरपंचायत कर्जत
**मुख्याधिकारी** कर्जत नगरपंचायत कर्जत

## नगरपंचायत कार्यालय, कर्जत

ता.कर्जत, जि.अहिल्यानगर
फोन नं. ०२४८९
न.प.कार्या/जा.क्र.१४७७/२०२५ दि.०१/०७/२०२५

## निविदा सूचना

मा.मुख्याधिकारी, नगरपंचायत कर्जत, ता.कर्जत, जि.अ.नगर हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील कंत्राटदारांकडून कामाची ऑफलाईन निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | विभागाचे तपशील | निविदा फॉर्म फी | निविदा बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| १. | कार्यालयीन कामकाजाकरिता कपाट व रॅक खरेदी करणे | ५००/- | २०००/- |
| २. | नगरपंचायत कार्यालयात सीसीटीव्ही बसविणे | ५००/- | २०००/- |
| ३. | नवीन नगरपंचायत कार्यालयात विविध विभागात फर्निचर बसविणे | ५००/- | २०००/- |
| ४. | पाणीपुरवठा विभागाकरिता दुरुस्तीकरिता साहित्य खरेदी करणे | ५००/- | २०००/- |
| ५. | विद्युत विभागाकरिता विविध प्रकारचे दुरुस्ती करिता साहित्य खरेदी करणे | ५००/- | २०००/- |

| अ.क्र. | नगरपंचायत प्रक्रिया | दिनांकापासून | दिनांकापर्यंत |
|---|---|---|---|
| १ | ऑफलाईन निविदा विक्री | ०२/०७/२०२५ (सकाळ १०.०० पासून) | ०८/०७/२०२५ (सायं. ६.०० पर्यंत) |
| २. | ऑफलाईन निविदा स्वीकृती | ०२/०७/२०२५ (सकाळ १०.०० पासून) | ०८/०७/२०२५ (सायं. ६.०० पर्यंत) |
| ३. | मूळ कागदपत्र सादर करणे | ०८/०७/२०२५ (सकाळ १०.०० पासून) | ०८/०७/२०२५ (सायं. ६.०० पर्यंत) |

१. कामाच्या सर्व अटी शर्ती निविदा संचासोबत उपलब्ध आहेत.
२. कोणतीही निविदा स्विकारणे नाकारणे अथवा रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार नगरपंचायतीस राहतील.

**नगराध्यक्षा** कर्जत नगरपंचायत कर्जत
**उपनगराध्यक्ष** कर्जत नगरपंचायत कर्जत
**मुख्याधिकारी** कर्जत नगरपंचायत कर्जत

### नामदेव गाथा पारायणानिमित्त

# देवगडच्या पंढरपूर मठात विद्युत रोषणाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** आषाढी वारी निमित्ताने देवगड संस्थानच्या पंढरपूर येथील मठामध्ये दि.२ जुलै ते दि.७ जुलै या कालावधीत गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांच्या प्रेरणेने व उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या पंचदिनात्मक नामदेव गाथा पारायण सोहळयाच्या निमित्ताने देवगडच्या पंढरपूर मठामध्ये केलेली आकर्षक विद्युत रोषणाई भाविकांचे आकर्षण ठरत आहे.

पंचदिनात्मक सोहळयाच्या निमित्ताने दि.२ जुलै रोजी सकाळी ७ ते १० यावेळेत श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबा यांच्या पालखीची क्षेत्र प्रदक्षिणा दिंडी निघणार आहे.

क्षेत्र प्रदक्षिणा दिंडीचे नेतृत्व गुरुवर्य भास्करगिरी महाराज व स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज हे करणार आहे.

पंढरपूर क्षेत्र प्रदक्षिणा दिंडीचा समारोप देवगड संस्थानच्या मठात होणार आहे,त्यानंतर रिंगण कार्यक्रम होऊन पंचदिनात्मक सोहळयास प्रारंभ होणार आहे या सोहळ्याच्या निमित्ताने श्री समर्थ सदगुरू किसनगीरी बाबांच्या पादुका प्रतिमा मंदिर,देवगड मठ वास्तू,गुरू सदन वास्तूवर श्रीरामपूर येथील सेवेकरी साहेबराव पवार व मनोज पवार यांच्या सत्कार डेकोरेशनच्या वतीने करण्यात आलेली भव्य विद्युत रोषणाई भाविकांचे आकर्षण ठरत आहे



पान १ वरुन

## अरुण तनपुरेंच्या मनगटी आश्वासनांचे घड्याळ

यांच्या राष्ट्रवादीतील प्रवेशाबाबत चर्चा सुरू झाल्या होत्या. निवडणूक निकालानंतर त्यांनी राष्ट्रवादीच्या अजित पवार गटात प्रवेश केला. काल (मंगळवारी) मुंबई येथे झालेल्या एका शानदार कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार गटाचे घड्याळ हाती बांधले. त्यांच्या पक्षप्रवेशामुळे कारखाना सुरू होणाची वाट प्रशस्त झाली आहे. गेल्या आठवड्यात अरुण तनपुरे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन त्यांचे घड्याळ हातात बांधले. त्यामुळे राहुरी तालुक्यातील तनपुरे गटाच्या कार्यकर्त्यांची चलबिचल झाली होती. काल त्यांनी अजित पवार यांची भेट घेऊन अधिकृत प्रवेश केला. त्यांच्या या पक्षप्रवेशाने राहुचीच्या राजकारणाला कलाटणी मिळण्याची शक्यता वाढली आहे. यावेळी पवार म्हणाले की, अरुण तनपुरे यांना संस्था नगरपालिका आणि बाजार समिती चालविण्याचा अनुभव असल्याने डॉ तनपुरे कारखान्याच्या निवडणुकीत सभासदांनी अरुण तनपुरेंच्या सक्षम नेतृत्वाला योग्य कौल दिला आहे. राहुरीशी माझे जुने नाते आहे. देवळाली प्रवरा हे माझे आजोळ आहे. त्यामुळे राहुरीकरांवर माझे विशेष प्रेम असल्याने अधिवेशन संपल्यानंतर मी राहुरीकरांसाठी खास एक दिवस देऊन राहिलेल्या मान्यवर कार्यकर्त्यांना की जे आज इथपर्यंत येऊ शकले नाही त्यांचाही पक्षप्रवेश राहुरीतच घडवून आणू. याप्रसंगी विजय डौले, वेणुनाथ कोतकर, दत्तात्रय पानसंबळ , अशोक वीटणोर, अय्युब पठाण, प्रकाश भुजाडी, बाळासाहेब उंडे, आदिनाथ कराळे, दीपक साळवे, नवनाथ ढोकणे, गोरक्षनाथ पवार, रखमाजी जाधव, दत्तात्रय शेळके, रामदास बाचकर, दत्तात्रय कवाणे, अशोक उऱ्हे , अरुण ढूस, सुरेश कर्पे, जनार्दन गाढे, भास्कर ढोकणे, सुभाष डुकरे, मधुकरराव पवार, महेश पानसरे, आबासाहेब वाळुंज, विलास तनपुरे, कृष्णा मुसमाडे, अप्पासाहेब जाधव, प्रदीप भुजाडी, दशरथ पोपळघट, नंदकुमार तनपुरे, सुखदेव चव्हाण, प्रदीप महड, किशोर वने, राहुरी तालुका राष्ट्रवादीचे सुनील भट्टड, प्रदीप भट्टड यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## सभागृहात गदारोळ, पटोले निलंबित

जोरदार संताप व्यक्त केला. यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले की, नाना पटोले तुमच्याकडून असंसदीय भाषेचा उपयोग होणे, मला बरोबर वाटत नाही, हे चुकीचे आहे, असे त्यांनी म्हटले. यानंतर नाना पटोले यांनी विधानसभा अध्यक्षांच्या जागेजवळ जात आपला संताप व्यक्त केला. यानंतर राहुल नार्वेकर यांनी सभागृहाची बैठक पाच मिनिटांसाठी रद्द केली. त्यानंतर राहुल नार्वेकर म्हणाले की, नाना पटोले हे सभागृहाचे अध्यक्ष राहीले आहेत. राज दंडाला हात लावल्यानंतर काय कारवाई केली जाते, याची कल्पना तुम्हाला असेल. मला कारवाई करायला भाग पाडू नका, असे त्यांनी म्हटले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अध्यक्षांच्या अंगावर धावून जाणे योग्य नाही, नाना पटोले यांनी माफी मागितली पाहिजे, असे म्हटले. यानंतर नाना पटोले यांना दिवसभरासाठी निलंबित करणार आल्याची घोषणा राहुल नार्वेकर यांनी केली. सभागृहाचं कामकाज चाललं पाहिजे, यासाठी मी नाना पटोले यांना निलंबित करत आहे, असे राहुल नार्वेकर यांनी म्हटले. तसेच, तुम्हाला निलंबित केलेला आहे, तुम्ही सभागृहाच्या बाहेर गेलं पाहिजे, असे राहुल नार्वेकर यांनी नाना पटोले यांना म्हटले. यानंतर नाना पटोले सभागृहाच्या बाहेर निघून गेले. नाना पटोले यांचे दिवसभरासाठी निलंबन करण्यात आल्याने विरोधकांनी सभात्याग केला.

## संरक्षक कठड्याला धडकल्याने दुचाकी जळून खाक

आग भडकल्यामुळे दुचाकीस्वार आगीमध्ये सापडला. तर दुसरा सहकारी धडकेमुळे दूरवर फेकला गेला. जवळच घर असलेले अनिल जाधव कुटुंबातील महिलांसह मदतीसाठी अपघातस्थळी धावले. बंटी धालवडे यास जीवाची पर्वा न करता बाजूला ओढून आग विझविण्याचा प्रयत्न केला. अपघातस्थळी जमलेल्या नागरीकांनी जखमींना उपचारासाठी पुढे पाठविले. जास्त भाजल्यामुळे बंटी धालवडे यांचा पुणे येथील ससून रुग्णालयात उपचार सुरु असताना मृत्यू झाला. अन्य जखमीवर उपचार सुरु आहेत.

## कुटुंबीयांना ४ लाखांची आर्थिक मदत

घटनामध्ये ही मदत लागू होणार नाही. याशिवाय, वारीदरम्यान अपघातामुळे अपंगत्व आल्यास देखील आर्थिक मदतीची तरतूद आहे. शासनाच्या नव्या परिपत्रकानुसार, विठ्ठलाच्या दर्शनासाठी येणाऱ्या वारकऱ्यांकरता वारी सुरू झाल्याच्या दिनांक पासून म्हणजेच १६ जून ते १० जुलैदरम्यान, अपघाताने अथवा दुर्घटनेत मृत्यू झालेल्या तसेच जखमी झालेल्या वारकऱ्यांसाठी मदतीची तरतूद करण्यात आली आहे. आत्महत्या, विषबाधा, खून वगळून इतर नैसर्गिक मृत्यू अपघाताने झालेल्या दुर्घटनांमध्ये ही आर्थिक मदत दिली जाईल.

## मराठीचीच सक्ती, पण हिंदीचाही अभिमान!

**मुंबई :** या महाराष्ट्रात सक्ती एकच आहे ती म्हणजे मराठी. मराठी शिकावीच लागेल. त्याचबरोबर आम्हाला हिंदीचाही अभिमान आहे. भारतातील प्रत्येक भाषेचा आम्हाला अभिमान आहे. पण इंग्रजीला पायघड्या घालायच्या आणि भारतीय भाषाला विरोध करायचा, हे आम्ही सहन करणार नाही. समिती स्थापन केली आहे, कोणाच्याही दबाबावाल बळी न पडता महाराष्ट्राच्या विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय घेऊ असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. भाजपचं सरकार आल्यानंतर आम्ही मुंबईचा चेहरा बदलून दाखवला. पण तुम्ही मुंबईतील मराठी माणसाला हद्दपार करण्याचं काम केल्याची टीका फडणवीसांनी उद्धव ठाकरेंच नाव न घेता केली.मंत्री रविंद्र चव्हाण यांची आज भाजपचे प्रदेशाध्यक्ष म्हणून निवड झाली. या कार्यक्रमात फडणवीस बोलत होते. आपण संघटनपर्व पूर्ण करत नव्या प्रदेशाध्यक्षाची प्रक्रिया पूर्ण केली आहे.

# पावसाअभावी तुषार सिंचन ठरतंय सोयाबीन पिकाला वरदान



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोल्हार :** राहुरी तालुक्यातील रामपूर येथील शेतकऱ्यानी पाऊसाच्या भरवश्यावर सोयाबीनची पेरणी केली मात्र आता पाऊसाने दडी मारल्याने हतबल झालेल्या शेतकऱ्याने तुषार सिंचनाचा वापर करून सोयाबिन पिकाला जीवनदान दिले. त्यामुळे तुषार सिंचन हे खरीपाच्या पिकांना वरदान ठरले आहे. रामपूर विविध कार्यकारी सोसायटीचे माजी चेअरमन श्री ज्ञानदेवराव पाटील लोखंडे यांनी त्यांच्या शेतामध्ये पाच एकर क्षेत्रामध्ये सोयाबीणची पेरणी केली.पण एन पावसाळ्याच्या तोंडावर मान्सून पाऊस लांबल्यामुळे बळीराजा हवालदील झाला आहे जुनंचा तिसरा ,चौथा आठवडा सरला असून पुरेसा पाऊस न झाल्यामुळे कोल्हार रामपूर व परिसरातील शेतकरी संकटात सापडला आहे.

मे महिन्यात मान्सूनपूर्व अवकाळी पाऊस चांगलाच झाला होता. मात्र खरीप पिकांना पेरणी मृग नक्षत्राचे पाणी सर्वच पिकांना संजीवनी सारखे लाभदायक असते अशा समज असल्याने खरीप पिकांची पेरणी झाली असताना पेरणी नंतर पाऊसाने पूर्णपणे उघडीप दिल्याने बळीराजाचे डोळे आता आभाळाकडे लागले आहे .

पाऊसायाभावी खरीप पिके धोक्यात येण्याची भीती निर्माण झाली आहे. रामपूर येथील राहिवासी कृषिमित्र व शेतीनिष्ठ प्रगतीशील शेतकरी ज्ञानदेव पाटील लोखंडे यांनी त्यावर उपाय म्हणून तुषार सिंचनाचा अवलंब केला. सोनगाव, कोल्हार, रामपूर परिसरातील सर्व शेतकऱ्यांना जास्त पाऊस पडेल अशी अपेक्षा होती. त्यामुळे मे, जुन महिन्यामध्ये कमी प्रमाणात झालेल्या बिगर मोसमी पावसामुळे त्याच्या अपुऱ्या प्रमाणातील ओलीवर सोयबीन व इतर खरीप पिकाची पेरणी केली.

मात्र आता जुन महिना संपून देखील वरूण राजाने अचानक पाठ फिरवली असून जास्त प्रमाणात बरसण्याऐवजी रुसून बसल्यासारखा झाला आहे. शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले असून त्यांना दिलासा न मिळाल्याने तो हवालदील झाला आहे. आभाळाकडे आस लावून पावसाची प्रतीक्षेत चातकाप्रमाणे वाट पहात आहे. सोयाबीन व इतर पिके अक्षरशः करपून चालली आहेत. पण रामपूर येथील या हडमासाच्या शेतकरी राजाने निसर्गाच्या या ओढावलेल्या संकटाला समर्थपणे तोंड देत पाच एकराच्या सोयाबीन क्षेत्रावर तुषार सिंचन वापराचा अनोखा प्रयोग करून सोयाबीन पिक दिमाखदारपणे जगवले आहे. जास्त पाणी वाया न जाता कमी पण पुरेशा पाण्यात देखील एकरी चांगले उत्पन्न मिळण्याची अपेक्षा त्यांना आहे. अशा पद्धतीने इतर छोटया शेतकऱ्यांनी देखील असा प्रयोग केल्यास नक्कीच फायद्याचे राहील व सर्वांना दिलासा मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### बनावट कामगारांवर थेट कारवाईचा शब्द दिल्याने

# समर्पणचे आंदोलन दुसऱ्या दिवशी स्थगित



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** जिल्हा कामगार कार्यालय अहिल्यानगर येथे दुसऱ्या दिवशी समर्पण च्या बांधकाम कामगारांचे धरणे आंदोलन व ढोल बजाव आंदोलन सुरूच होते. बनावट बांधकाम कामगारांचा जो सुळसुळाट जिल्हाभर झालेला आहे त्याच्या विरोधात ठोस कार्यवाहीच्या लेखी आश्वासनासाठी कामगार आजही आग्रही होते. आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी मंगळवारी बनावट कामगारांवर थेट कारवाईचा शब्द दिल्याने समर्पणचे आंदोलन स्थगित करण्यात आले

सदर बाबतीत भरारी पथक तातडीने नियुक्त करून ग्रामपंचायत स्तरावर कामगारांची ओळख परेड केली जाईल आणि बनावट आढळलेल्या कामगाराकडून त्याने आजपर्यंत मंडळाकडून लाटलेला परत मिळवला जाईल. त्याची नोंदणी तातडीने जागेवर रद्द करण्यात येईल. असे बोगसकाम करणाऱ्यांवर तसेच बोगसपणा करण्यास प्रवृत्त करणाऱ्या असामाजिक तत्त्वांवर तातडीने फौजदारी गुन्हे दाखल केले जातील, अशी ग्वाही सह कामगार आयुक्त श्री रेवन्नाथजी भिसले साहेब यांनी दिली.

त्याचबरोबर लाभ वाटपाच्या कामात सुसूत्रता आणली जाईल. महिनाअखेरीस झिरो पेंडन्सी या तत्त्वावर काम करण्याचे आश्वासन दिले गेले. आरोग्य विमा योजना ही अधिक कार्यक्षम पद्धतीने राबवली जाणार आहे. यामध्ये स्पेशलिटी हॉस्पिटल देण्याची प्रक्रिया सुरू केलेली जाईल. कामगारांना अत्ययिक अवस्थेत जास्तीत जास्त मदत मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाईल. यापुढे सुरक्षा संच व भांड्यांचा संच वाटप करताना अपॉइंटमेंट सिस्टीम राहील, जेणेकरून एजंट लोक दिशाभूल करून गरीब कामगारांकडून आर्थिक लूट करू शकणार नाहीत. अशाप्रकारे सर्व मुद्द्यांवर अतिशय सकारात्मक पद्धतीने मंडळाच्या वतीने सह कामगार आयुक्त श्री रेवन्नाथजी भिसले यांनी प्रतिसाद दिला. त्यामुळे सर्वानुमते आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

यावेळी कामगारांच्या वतीने जेष्ठ कामगार डेविड साळवे, दीपक भोंगळ, रंगनाथ डुकरे, कृष्णा डहाळे,किरण पप्पू चेमटे, अमोल शेरे, पांडुरंग मते, बाबासाहेब टिळेकर, ठेकेदार गायकवाड, मायकल गायकवाड व डॉ करणसिंह घुले यांनी चर्चेत सहभाग घेतला. यावेळी कृष्णा ज्ञानदेव डहाळे,रंगनाथ डुकरे, दीपक भोंगळ,समाधान गुजर,नवाब भाई शेख तरवडी, बालम भाई सय्यद तरवडी,बाबासाहेब दातीर,सावता रासकर गोपाळपूर,विकास देवकर गोपाळपूर,अमोल शेरे खामगाव,सोपान काळे खामगाव,बाबासाहेब काळे, लक्ष्मण आगळे,तुकाराम जगदाळे, सावळेराम शेरे,नवनाथ सुखदान,प्रकाश रोटे, सरपंच बाबासाहेब शेलार,योगेश काळे खामगाव, शिवाजी शेरे खामगाव,विकास काळे, हरिभाऊ लहाने, राजेंद्र सरोदे, दत्तू वागळे,राहुल खोमणे, रवी मकासरे,धीरज किरण शेरे,पोपट शेकडे,संदीप गुजर, नारायण मोहिते,रवी गोरे,दत्तू भारस्कर,संजय वालेकर सह मोठ्या प्रमाणात कामगार उपस्थित होते.

# शेतकरी कर्जमाफीच्या प्रतीक्षेत;मात्र बँकेचा वसुलीसाठी आटापिटा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव :** लाखोंचा पोशिंदा म्हणून शेतकऱ्याकडे पाहिले जाते मात्र शेतीमालाला भाव नाही दुष्काळ व आपत्ती यामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. लाडकी बहीण योजना, शेतकरी अनुदान योजना व इतर योजनेप्रमाणेच शेतकऱ्यांचे कर्ज योग्य वेळी माफ केले जातील या सरकारच्या घोषणेने शेतकरी कर्जमाफीच्या प्रतीक्षेत आहे.

बँका व सहकारी सोसायट्या यांनी कर्ज वसुलीसाठी आटापिटा सुरू केला आहे. आता जर कर्ज भरले व सरकारने कर्जमाफीची घोषणा केली किंवा कर्जमाफी केली तर आपण कर्जमाफी पासून वंचित राहणार शेतकरी संभ्रमात आहे. एरवी सोसायटीचे कर्ज भरण्यासाठी शेतकऱ्यांना भरण्यासाठी उसनवारी ,दागिने गहाण व सावकारांकडून पैसे घेतल्याशिवाय पर्याय नव्हता. आता देखील शेतकरी मोठ्या प्रमाणावर अडचणीत असून शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली तर काही अंशी त्यांना दिलासा मिळू शकतो. कर्जमाफी होणार या आशेने शेतकरी दग धरून आहे. सोसायटीचे प्रतिनिधी, सचिव व प्रशासकीय अधिकारी शेतकऱ्यांनी कर्ज भरले पाहिजे यासाठी वसुलीचा धाक दाखवत आहे. १०१ च्या नोटीसा सुद्धा काही सोसायटीने देऊ केल्या आहे.

मागच्या वेळेच्या कर्जमाफीच्या वेळी सभासदांनी कर्जमाफी होणार म्हणून कर्जाची रक्कम अनामत म्हणून कोपरगाव तालुक्यातील काही सोसायटीच्या विश्वासावर बँकेत ठेवली होती. मात्र सोसायटी ३०/६ च्या आत बँक लेव्हल वर वसूल व्हावी यासाठी ती रक्कम कर्ज खात्यात वर्ग करण्यात आली होती. आणि नंतर कर्जमाफी झाली त्यावेळी अनेक सभासद कर्जमाफी पासून वंचित राहिले. दुधाने पोळल्यावर ताक देखील फुंकून प्यायचा असतं. याप्रमाणे आता शेतकरी सावध झाले आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ फडणवीस यांनी देखील योग्य वेळी कर्जमाफी केली जाईल अशी घोषणा केली आहे. आता ती योग्य वेळ कधी येते याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

**कर्जमाफी मागणारे शेतकऱ्यांप्रमाणेच नियमित कर्ज भरणारे शेतकरी देखील मोठ्या प्रमाणावर आहे . कर्जमाफी झाली तरी नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना देखील सरकारने कर्जमाफी प्रमाणे लाभ दिला पाहिजे. रिझर्व बँकेने देखील भविष्यात कर्जमाफी झाली तर रेगुलर सभासदांना लाभ द्यावा लागेल असे संकेत दिले आहे.**


**नावात बदल**

माझे लग्ना पूर्वीचे नाव कुमारी **माधुरी विनायक जोशी** असे असून लग्नानंतर ते बदलून **सौ. स्मिता दत्तात्रय जोशी** असे झाले आहे.
वरील दोन्ही नावाच्या व्यक्ती ही एकच असून अन्य दुसरी कोणीही नाही.
**प्रतिज्ञापत्र क्रमांक–**
**२५५२२४२०४१२६८१**
**००५८९८७३**
दि ३०/०६/२०२५

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAMES **ARUNABAI GOVIND BACHKAR AND ARUNABAI** (MOTHERS NAME AS PER SCHOOL DOCUMENTS OF **KIRAN GOVIND BACHKAR**) TO NEW NAME AS **ARUNA GOVIND BACHKAR VIDE AADHAR NO.2355 6386 3294**


## निधन वार्ता..

### हरिभाऊ कापसे



**श्रीरामपूर :** तालुक्यातील भेर्डापूर/पाथरे येथील प्रगतशील शेतकरी कै. हरीभाऊ शिवराम कापसे (वय ६३ वर्षे) यांचे नुकतेच अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले. त्यांचे पश्चात पत्नी श्रीमती मंदा कापसे, एक मुलगा सोमनाथ कापसे, पुतणे, सूना, नातवंडे असा परिवार आहे. अशोक कारखान्यातील कर्मचारी श्री.शशिकांत कापसे यांचे ते चुलते होत.

# घोडी कप्पी नेण्याच्या वादावरून एकास मारहाण

**राहुरी :** तू आमची मोटार बोअरवेलमध्ये सोडायचे काम पुर्ण कर, तरच तुझी घोडीकप्पी येथुन घेवुन जा, असे म्हणुन आरोपींनी अण्णा हंडाळ यांना शिवीगाळ करुन दगड व लाथा बूक्क्यांनी मारहाण केल्याची घटना दि. ३० जून रोजी सायंकाळच्या सुमारास राहुरी तालुक्यातील वावरथ जांभळी येथे घडली.

आण्णा नामदेव हंडाळ, वय ३२ वर्षे, हे राहुरी तालुक्यातील वावरथ जांभळी, येथे राहत असून ते इलेक्ट्रीक मोटार बोअरवेलमध्ये सोडण्याचे काम करतात. आण्णा हंडाळ हे दि. २९ जून रोजी बिरा तिखुले यांची इलेक्ट्रीक मोटार बोअरवेलमध्ये सोडण्यासाठी गेले होते. त्या ठिकाणी हंडाळ यांची घोडी कप्पी बिघडल्याने काम अधूरे राहिले. दि. ३० जून रोजी आण्णा हंडाळ हे बिरा तिखुले यांच्या शेतात गेले. आणि त्यांना म्हणाले कि, घोडी कप्पी दुरुस्त करण्यासाठी घेऊन जावी लागेल. त्यावेळी आरोपी म्हणाले कि, तु आमची मोटार बोअरवेलमध्ये सोडायचे काम पुर्ण कर, तरच तुझी घोडीकप्पी येथुन घेवुन जा, असे म्हणुन आरोपींनी अण्णा हंडाळ यांना शिवीगाळ करुन दगड व लाथा बूक्क्यांनी मारहाण केली. तसेच तु आमचे मोटारचे पुर्ण काम केल्या शिवाय घोडीकप्पी येथुन घेवुन गेला तर तुला जिवे मारुन टाकु, अशी जिवे मारण्याची धमकी दिली.

घटनेनंतर आण्णा नामदेव हंडाळ यांनी राहुरी पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून आरोपी बिरा नाथा तिखुले, धुळा नाथा तिखुळे, किशोर धुळा तिखुळे, दादु बिरा तिखुले, तसेच त्यांच्या कुटुंबातील तीन महीला, सर्व रा. वावरथ, ता. राहुरी, या सात जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे हे करीत आहेत.

# ४ जुलै रोजी श्रीरामपूर येथे पेन्शनर्स मेळावा

**शिरसगाव :** राष्ट्रीय संघर्ष समिती अहिल्यानगर यांच्या वतीने उत्तर जिल्ह्यातील विशेषतः श्रीरामपूर आणि शैजारील तालुक्यातील सर्व ईपीएस पेन्शनरांच्या, पेन्शन वाढीसाठी कमांडर राउत यांच्या नेतृत्वाखाली चालू असलेल्या लढ्याची सध्याची वस्तूस्थिती व पुढील रणनीती यावर सविस्तर चर्चा करण्यासाठी शुक्रवार दि.४ जुलै रोजी सकाळी ११ वा. काँग्रेस भवन, डावखर रोड, श्रीरामपूर येथे मेळावा आयोजित करण्यात आला आहे. आपली मागणी दरमहा पेन्शन रु.७५०० व निगडित महागाई भत्ता आणि मोफत वैद्यकीय सुविधा अशी असून सध्या प्रसार माध्यमांतून विविध तर्कवितर्क लावण्यात येत आहेत.त्यातून पेन्शनरांची एकप्रकारे दिशाभूल केली जात आहे.त्यामुळे नेमकी वस्तुस्थिती समजावून घेणे आवश्यक आहे. कोणीही खोट्या अफवांवर विश्वास ठेवू नये.याबाबत सत्य स्थिती समजून घेण्यासाठी पेन्शन धारकांनी उपस्थित राहावे. असे आवाहन

संपत समिंदर जिल्हाध्यक्ष, आशाताई शिंदे, अध्यक्षा महिला आघाडी, सर्व तालुकाध्यक्ष व पदाधिकारी राष्ट्रीय संघर्ष समिती अहिल्यानगर यांनी केले आहे.


## नशिबाची परिक्षा

**बुधवार दि. ०२ जुलै २०२५**

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १३० २४८ २२० | ०-३ | १२४ ४६७ ७०० | जोड ४०-६७-९१-८२-७५ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १२७ २८० ४६० | ०-४ | १५८ ६८० ४५५ | जोड ०६-२४-३९-५७-४८ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १७९ २७८ ३७७ | ७-० | १४५ २३५ ५५० | जोड ७२-३०-१८-४५-०९ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| 14/04/2025 to 19/04/2025 | 257 40 389 | 270 96 268 | 169 62 570 | 169 62 570 | 489 15 168 | 359 76 240 |
| 28/04/2025 to 03/05/2025 | 789 43 256 | 128 14 167 | 345 25 168 | 150 69 180 | 136 05 159 | 127 00 569 |
| 05/05/2025 to 10/05/2025 | 135 98 116 | 479 04 112 | 136 03 148 | 123 62 138 | 158 47 269 | 257 45 258 |
| 12/05/2025 to 17/05/2025 | 233 82 336 | 569 00 389 | 278 74 590 | 288 83 157 | 389 08 468 | 690 57 160 |
| 19/05/2025 to 24/05/2025 | 900 99 360 | 190 00 145 | 167 47 340 | 237 21 137 | 179 72 129 | 390 26 367 |
| 26/05/2025 to 31/05/2025 | 148 30 145 | 259 61 128 | 470 16 457 | 125 81 678 | 790 65 690 | 247 38 170 |
| 02/06/2025 to 07/06/2025 | 229 34 455 | 899 62 138 | 778 21 470 | 244 02 336 | 255 23 247 | 110 24 248 |
| 09/06/2025 to 14/06/2025 | 579 11 335 | 990 89 568 | 356 40 578 | 160 76 790 | 158 44 167 | 133 75 159 |
| 16/06/2025 to 21/06/2025 | 578 07 115 | 220 42 138 | 446 48 125 | 148 33 599 | 278 72 390 | 689 34 770 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

# जिल्ह्यात ६८ हजार ५८५ मतदारांची भर; महिलांचा टक्का वाढला

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारसंख्या निर्णायक ठरणार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** विधानसभा निवडणुकीनंतर अवघ्या आठ महिन्यांत नगर जिल्ह्यात तब्बल ६८ हजार ५८५ नव्या मतदारांची नोंदणी झाली असून, यात महिला मतदारांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे. सध्या जिल्ह्यात एकूण मतदारांची संख्या ३८ लाख २९ हजार ९७ इतकी झाली आहे. जिल्हा निवडणूक शाखेकडून मिळालेल्या माहितीनुसार, यामध्ये १९ लाख ६६ हजार ९२० पुरुष, १८ लाख ६१ हजार ९७८ महिला, आणि १९९ तृतीयपंथी मतदार आहेत. विशेष म्हणजे या कालावधीत महिला मतदारांची संख्या ३८ हजार ५६७ ने वाढली, तर पुरुष मतदारांची वाढ ३० हजार २० इतकी झाली आहे. मात्र, तृतीयपंथी मतदारांची संख्या दोनांनी घटली आहे. नगर शहरात सर्वाधिक वाढ जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदारसंघांपैकी सर्वाधिक वाढ नगर शहर मतदारसंघात झाली असून, येथे ११ हजार ८२ नवमतदारांची नोंदणी झाली आहे. त्याखालोखाल राहुरीत ७ हजार ५३५, पारनेरमध्ये ६ हजार ३४१, आणि शेवगावमध्ये ५ हजार ७९३ मतदारांची भर पडली आहे. मतदारसंख्येनुसार नवी प्रभागरचना जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका लवकरच होण्याची शक्यता असून, त्यासाठी ३९ लाख मतदारांच्या आकडेवारीवरून प्रभागरचना व आरक्षण प्रक्रिया सुरू झाली आहे. ०१७ नंतर २०२१ मध्ये गट-गणातील लोकसंख्येत बदल करत नवी रचना सादर झाली होती, परंतु त्या रचनेला न्यायालयीन स्थगिती मिळाली होती. सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच निवडणुका घेण्याचे आदेश दिल्याने कार्यवाही`गाने सुरू झाली आहे. मतदारसंघानुसार वाढ: मतदारसंघ मतदारवाढ अकोले २,७६९ संगमनेर ५,३१८ शिर्डी ५,०६३ कोपरगाव ३,६१७ श्रीरामपूर ४,९७७ नेवासा ५,२३३ शेवगाव ५,७९३ राहुरी ७,५३५ पारनेर ६,३४१ नगर शहर ११,०८२ श्रीगोंदा ५,०८४ कर्जत-जामखेड ५,०११ महिला मतदारसंख्येतील लक्षणीय वाढ ही एक सकारात्मक घडामोड असली, तरी आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत ही वाढ कोणत्या पक्षाच्या पारड्यात जाते, यावरच स्थानिक सत्तेची गणितं ठरणार आहेत.

## द • ख • ल

### अल्पवयीन मुलीच्या शोधासाठी पालकांचे आज उपोषण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** तालुक्यातील चांडगाव येथील एका अल्पवयीन मुलीला लागाचें आमिष दाखवून पळवून नेल्याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करूनही कोणत्याही प्रकारची दखल घेतली नसल्यामुळे पालकाने हताश होऊन उद्या आमरण उपोषण करणार असल्याचे निवेदन दिले आहे. श्रीगोंदा तालुक्यातील चांडगाव येथील एका आदिवासी समाज्यातील १७ वर्षीय अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेल्याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यास गेल्यावर मोठ्या प्रमाणात टाळाटाळ करण्यात आली. शेवटी गुन्हा दाखल करावाच लागला असून त्यांनी अल्पवयीन मुलीला एमआयडीसी पोलीस ठाणे अहिल्यानगर येथे हजर केले तेथून तिला श्रीगोंद्यात आणण्यात आले त्यावेळी तिची मेडिकल टेस्ट करण्यात आल्यावर तिच्याबरोबर बलात्कार झाल्याचे मुलीने सांगितले दरम्यान कालावधीत पोलिसांनी सहकार्य केलं नसल्यामुळे मुलीवर अत्याचार झाला असल्याचा आरोप पीडित मुलीच्या पालकाने केला आहे तसेच सदर घटनेत पॉक्सो यासह वाढीव कलमे लावली नाहीत तसेच मुलीला दुसऱ्यासोबत पाठवले तेव्हापासून मुलगी बेपत्ता असून मुलीचा लवकरात लवकर तपास व्हावा तसेच यातील आरोपी आणि मदत करणारे पोलीस यांच्यावर कठोरात कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी आज २ जुले रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर कुटुंबासहित आमरण उपोषणास बसणार असल्याची माहिती पालकांनी दिली आहे.

### स्व.वसंतराव नाईक जयंती उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**




**करंजी :-** स्व. वसंतराव नाईक यांच्यामुळेच हरितक्रांती आली व अन्नधान्य उत्पादनात महाराष्ट्र आघाडीवर असल्याचे उत्पादन समनक जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष अशोक चव्हाण यांनी केले. करंजी. ता. पाथर्डी येथे राज्याचे माजी मुख्यमंत्री व हरितक्रांतीचे जनक स्व. वसंतराव नाईक यांची ११२ वी जयंती नुकतीच साजरी करण्यात आली यावेळी ते बोलत होते यावेळी भाऊसाहेब शंकर क्षेत्रे , काशिनाथ अकोलकर प्रमुख उपस्थित होते.यावेळी बोलताना चव्हाण म्हणाले कि राज्याचे मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक हे स्वतः शेतकरी कुटुंबातून आलेले होते. विदर्भ व मराठवाड्यातील जिरायती शेतकऱ्यांच्या समस्या ते चांगल्या प्रकारे जाणून होते. त्यामुळे त्यांच्या काळात कुशलपणे दुष्काळाच्या समस्येला ते समर्थपणे तोंड देऊ शकले. महाराष्ट्रातील शेतीला नवे वळण देण्यासाठी त्यांनी लघु आणि मध्यम सिंचन प्रकल्पाची स्थापना करून राज्यातील कृषी सिंचन समस्या सोडविल्या. त्यामुळे पिकाचे उत्पन्न वाढले आणि विविध प्रकारच्या अन्नधान्यांमध्ये महाराष्ट्र राज्य स्वयंपूर्ण होऊ शकले.त्यांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनातील दैन्य व दारिद्र्य दूर करून समृद्धी आणि विकासाचे महापर्व आणले असल्याचे चव्हाण यांनी यावेळी सांगितले.चंद्रकांत क्षेत्रे , राजू राठोड , दीपक राठोड , रविंद्र राठोड यांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### हिवरे बाजारमध्ये अधिकाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून कृषी दिन साजरा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** जागतिक कृषी दिनाचे औचित्य साधून १ जुलै रोजी आदर्श गाव हिवरे बाजार येथे 'एक वृक्ष आईसाठी, एक वृक्ष देशासाठी' या संकल्पनेतून १८०० देशी वृक्षांची लागवड सुरू झाली आहे. मातृस्मृती वनमंदिर परिसरात पार पडलेल्या वृक्षारोपण कार्यक्रमात जिल्हा जलसंधारण अधिकारी पांडुरंग गायसमुद्रे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) संध्या गायकवाड आणि विभागीय वन अधिकारी संजय कंद यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.ावेळी बोलताना उपस्थित अधिकाऱ्यांनी हिवरे बाजारच्या सातत्यपूर्ण ग्रामविकास उपक्रमांचे भरभरून कौतुक केले.कार्यक्रमात पद्मश्री पोपटराव पवार यांनी हिवरे बाजारमध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. ग्रामस्थांनी त्यांचा फेटा, शाल, श्रीफळ आणि गुलाबपुष्प देऊन सन्मान केला. यावेळी बांधकाम विभागाचे शाखा अभियंता हर्षल काकडे, जलसंधारण विभागाचे शाखाअभियंता श्री. शेळके, तसेच उद्योजक श्रेयस दरे यांची उपस्थिती होती.कार्यक्रमास सरपंच मलताई ठाणगे, चेअरमन छबुराव ठाणगे, व्हा. चेअरमन रामभाऊ चत्तर, सखाराम पादीर सर, रोहिदास पादीर, अशोक गोहड, संजय पवार आणि इतर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# तनपुरेवाडी शाळेचे मंथन राज्यस्तरीय सामान्यज्ञान परीक्षेत यश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** पारनेर तालुक्यातील निघोज गावाच्या हद्दीत येणाऱ्या जिल्हा परिषद शाळा तनपुरेवाडी येथील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात नवा मानाचा ठसा उमटवत मंथन प्रज्ञाशोध परीक्षा २०२५ मध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ नगर येथील डरका लॉन्स येथे पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष शिरीष मोडक शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे शैलेश मोरे यांच्या हस्ते गौरवण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या अपूर्व यशामुळे तनपुरेवाडी शाळेचा लौकिक पुन्हा एकदा उंचावला आहे. गुणवत्तेची परंपरा जपणारी तनपुरेवाडी शाळा सतत विविध स्पर्धा परीक्षा व उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत आहे. यंदाच्या मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत विशेषतः दुसरी इयत्तेतील विद्यार्थ्यांनी अतिशय कौतुकास्पद कामगिरी केली आहे. या परीक्षेत -- कु. अर्णव अंकुश सोनवणे या विद्यार्थ्याने १५० पैकी १५० गुण मिळवून राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे, जो अत्यंत अभिमानास्पद आहे. - कु. श्रेयश सुरेश गाडिलकर व कु. श्रेयश शंकर मेहेरयांनी १५० पैकी १३४गुण मिळवून जिल्ह्यात चतुर्थ क्रमांक मिळवला आहे. - तसेच कु. पार्थ विष्णू सोजे व कु. आरोही संतोष तनपुरे यांनी १५० पैकी १३८ गुण मिळवत जिल्ह्यात तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.या सर्व विद्यार्थ्यांनी मेहनत, सातत्यपूर्ण सराव आणि शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन याच्या जोरावर हे यश मिळवले आहे.शाळेचे मुख्याध्यापक बन्सी गुंड व गंशिक्षिका मंगल भुकन यांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन व सातत्यपूर्ण प्रोत्साहन दिले. या यशामध्ये संपूर्ण शिक्षकवृंदाचाही मोलाचा वाटा आहे.




तनपुरेवाडी शाळेमध्ये वर्षभर विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेतली जाते. अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक दृष्टिकोन रुजवण्यासाठी विशेष उपक्रम राबवले जातात. याचा सकारात्मक परिणाम म्हणून प्रत्येक वर्षी शाळेचे विद्यार्थी जिल्हा व राज्य पातळीवर उत्तुंग यश मिवत आहेत. या घवघवीत यशानंतर शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ, तसेच सर्व पालक मंडळींनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सर्वत्र सदिच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

## विठ्ठलनाथ महाराज पायीत दिंडी

### उषा मरकड यांची प्रवचनसेवा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** भावीनिमगाव ते पंढरपूर या पायी दिंडी सोहळ्याचा सातवा दिवस आध्यात्मिक रंगात रंगलेला दिसून आला. या दिवशी ह.भ.प. उषाताई रावसाहेब मरकड यांची प्रवचनसेवा भक्तिभावाने संपन्न झाली. त्यांनी आपल्या रसाळ वाणीने उपस्थित वारकऱ्यांना नामस्मरणाचे महत्त्व पटवून दिले.त्या म्हणाल्या, नामस्मरण करताना अंतःकरणातून भाव असणे गरजेचे आहे. श्रद्धा संतांवर ठेवली, तर संत स्वरूपातून समाधान व शांतता प्रदान करतात. त्यामुळे मन शुद्ध होते आणि जीवनात सकारात्मकतेची आवड निर्माण होते. त्यांनी इवलेसे रोप लाविले डरी, त्याचा वेलू गेला गगनावरी या उक्तीचा संदर्भ देत दिंडीच्या प्रथम वर्षातच भव्यदिव्य स्वरूप निर्माण झाल्याचे कौतुक केले.दिंडीचे प्रमुख मार्गदर्शक अशोक महाराज बोरुडे यांच्या नेतृत्वाखाली या पायी दिंडी सोहळ्याचे उत्कृष्ट आयोजन करण्यात आले आहे. श्रोतृवर्गाला मार्गदर्शन करताना उषाताईंनी सांगितले की, ''आचरण शुद्ध असेल तरच देव प्रसन्न होतो. संत संगतीमुळे अंतःकरण निर्मळ होते. जन्ममरणाच्या या फेरातून मुक्त व्हायचे असेल, तर संतचरणच अंतिम मार्ग आहे.या भक्तीमय वातावरणात दिंडी पुढे जात असून, प्रत्येक टप्प्यावर संतवाणी आणि हरिपाठाचा गजर निनादत आहे. संपूर्ण वातावरण विठुनामाने गजरत आहे. या दिंडी सोहळ्यात बबनराव भुसारी, बबनराव जगदाळे,अंबादास कळमकर,चेअरमन मिलिंद कुलकर्णी, माजी सभापती त्रिंबक जाधव, निलेश कुंभकर्ण,आदि उपस्थित होते



# ढाकणे इंजिनिअरिंग कॉलेज ५ जुलैला रोजगार मेळावा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

शेवगाव : समाजभूषण एकनाथराव ढाकणे कॉलेज ऑफ इंजीनियरिंग शेवगाव राक्षी या ठिकाणी कॅम्पस इंटरव्यू डरे सर्व स्तरातील विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या कंपन्यांना निमंत्रित करून रोजगार निर्मिती होण्यासाठी मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. अशी माहिती संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्राध्यापक श्रीकांत ढाकणे व संस्थेचे खजिनदार ऋषिकेश ढाकणे यांनी दिली केदारेश्वर ग्रामीण विकास प्रतिष्ठान संगमनेर संचलित ढाकणे शैक्षणिक संकुल अंतर्गत राक्षी या ठिकाणी उच्चतंत्र शिक्षणाची सुविधा निर्माण झालेली असून त्या माध्यमातून अनेक मुला-मुलींना उच्च दर्जाचे शिक्षण दिले जात आहे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर जागेवर कॅम्पस इंटरव्यू घेऊन ग्रामीण भागामध्ये पुणे,मुंबई,छत्रपती संभाजी नगर,अहिल्यानगर,नाशिक,पैठण या ठिकाणावरील कंपन्यांना आमंत्रित करून त्यांना विद्यार्थी गुणवत्तेनुसार उपलब्ध करून दिले जातात.बॅचलर ऑफ इंजीनियरिंग डिप्लोमा इंजीनियरिंग एमबीए आयटीआय चे पास झालेले विद्यार्थी आणि पदवीधर विद्यार्थी की ज्यांनी कुठेही शिक्षण घेतलेला असेल त्यांनी आवश्यक कागदपत्र घेऊन ५जुलै रोजी राक्षी या ठिकाणी उपस्थित रहावे.असे आवाहन प्लेसमेंट ऑफिसर प्राध्यापक महेश मरकड डॉ आर. एच.अत्तार प्राचार्य एमबीए कॉलेज यांनी केली आहे.

# वाढदिवसानिमित्त अनोखा उपक्रम राबविण्याचा मानस : आ. विक्रम पाचपुते

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा:** तालुक्याचे विद्यमान आमदार विक्रम बबनराव पाचपुते यांचा दि. ०२ जुलै रोजी आज वाढदिवस आहे. खरेतर विधानसभेचे पावसाळी अधिवेशन सुरु झाल्यामुळे आमदार मतदारसंघात उपस्थित राहू शकत नव्हते. परंतु कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे व प्रेमामुळे आमदार विक्रम पाचपुते काष्टी येथील निवासस्थानी सकाळी ७:०० ते दुपारी २:०० वाजेपर्यंत उपस्थित असणार आहेत. माध्यमांशी बोलताना आमदारांनी श्रीगोंदा व नगर विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांना नम्र आवाहन केले आहे की ,बुधवार दिनांक ०२जुले रोजी आज होणाऱ्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी कोणीही फेटा,शाल, हार, पुष्पगुच्छ न आणता आपण निसर्गाचे काहीतरी देणे लागतो या भावनेतून वृक्ष संवर्धन म्हणून कुठल्याही प्रकारचे एक झाड किंवा गरीब शालेय विद्यार्थ्यांसाठी वह्या भेट शुभेच्छा म्हणून घेऊन याव्यात. झाडाचे संगोपन आमदार साहेब यांच्या वतीने वृक्ष लागवड करून होणार आहे. भेटवस्त म्हणून आलेल्या वह्यांचे गरीब शालेय विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येणार आहे.तरी कृपया सर्वांना नम्र विनंती आहे आपण येताना वाढदिवसाची भेट म्हणून एक झाड किंवा शालेय साहित्य म्हणून वह्या घेऊन यावे.अशी विनंती आमदार विक्रम पाचपुते यांनी श्रीगोंदा-नगर विधानसभा मतदारसंघातील सर्व नागरिकांना केली आहे.

# पाथर्डीत वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी:** वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त शहरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील नाईक चौकात वसंतराव नाईक यांच्या पूर्णकृती पुतळ्यास दिवसभर विविध मान्यवरांकडून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन समस्त गोरसेना व गोरबंजारा समाजाच्या वतीने करण्यात आले.याप्रसंगी तहसीलदार डॉ.उद्धव नाईक,गटविकास अधिकारी शिवाजी कांबळे, तालुका कृषी अधिकारी महादेव लोंढे,नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे,पोलिस उपनिरीक्षक विलास जाधव,प्रभाकर राठोड,आर के चव्हाण,नवनाथ चव्हाण,अरविंद सोनटक्के,डॉ मृत्युंजय गर्जे,नंदकुमार शेळके,बंडूशेठ बोरुडे आदी उपस्थित होते.आलेल्या मान्यवरांना वृक्षरोपणासाठी वृक्षाचे वाटप करण्यात आले. दरम्यान पाथर्डी पंचायत समितीमध्ये पंचायत समिती कृषी विभागातर्फे वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी आयोजित मार्गदर्शन कार्यक्रमात तहसीलदार डॉ.उद्धव नाईक म्हणाले की,माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी कृषी,उद्योग आणि शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. त्यांच्या दूरदृष्टीमुळे राज्यात कृषी विद्यापीठांची स्थापना झाली आणि महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला.त्यांनी हरितक्रांती घडवली,औद्योगिक क्रांतीचा पाया घातला आणि समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी कार्य केले.त्यांच्या विचारांचा आदर्श ठेवून शेतीसाठी नैसर्गिक खतांचा अधिक वापर करावा असे आवाहनही त्यांनी केले. कृषी अधिकारी महादेव लोंढे म्हणाले की,१९७२ च्या दुष्काळात वसंतराव नाईक यांनी अन्नधान्याच्या संकटावर मात करण्यासाठी ऐतिहासिक निर्णय घेतले.त्यांच्या कार्यकाळात कृषी विद्यापीठे सुरू झाली.जलसंधारणाला चालना मिळाली आणि राज्यात हरितक्रांती घडली. त्यांच्या प्रयत्नांमुळे केवळ शेतीच नव्हे तर शेतकऱ्यांचं जीवनही बदललं.कृषीदिनानिमित्त तालुक्यातील शिराळ येथील बाजरीचे प्रथम क्रमांकाचे उत्पादन निखिल घोरपडे, द्वितीय शशिकांत शिंदे (भोसे), तर तूर उत्पादनात तृतीय क्रमांकाचे उत्पादन घेणारे हनुमंत घोरपडे,(शिराळ) या शेतकऱ्यांचा तालुका कृषी कार्यालयाकडून सन्मान करण्यात आला. किरण राठोड,संजय पवार, सुनील देखणे, किशोर राठोड,दीपक राठोड,सुभाष केदार, वैभव थोरे,अतुल बनकर,राजू पवार,ओमप्रकाश दहिफळे,अमोल तांदळे, सुधीर खेडकर,,तेजू राठोड, मोहन पवार,रामभाऊ राठोड,




वसंतराव नाईक जयंती निमित्त कृषी दिनानिमित्त सर्वात जास्त पीक उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. शहरातील वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याला तहसीलदार उद्धव नाईक,गटविकास अधिकारी शिवाजी कांबळे,कृषी अधिकारी महादेव लोंढे,पोलीस उपनिरीक्षक विलास जाधव आदी अभिवादन करताना.

विजय राठोड,,भाऊसाहेब चव्हाण,,अंबर चव्हाण, शाम पवार, नितीन राठोड,,योगेश राठोड,अविनाश दौंड,आदीं उपस्थित होते.प्रास्ताविक बाळासाहेब कांडेकर तर आभार देविदास दहिफळे यांनी मानले.

# लिंपणगावच्या सिद्धेश्वर मंदिरातील दानपेटी फोडली

## दानपेटीतील मोठी रक्कम चोरीला गेल्याचा अंदाज

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील धार्मिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या लिंपणगाव येथील ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराज मंदिरातील दानपेटी अज्ञात चोरट्यांनी फोडून त्यातील मोठी रक्कम लंपास केली. सोमवारी केली. दरम्यान गावचे ग्रामदैवत सिद्धेश्वर महाराजांच्या दर्शनासाठी अनेक भाविक व मंदिराचे पुजारी हे दररोज आरती घेण्यासाठी पहाटे चारच्या सुमारास मंदिरात येतात. परंतु मंदिरात प्रवेश करतेवेळी पुजारी व भाविकांना सदर मंदिराच्या प्रवेशद्वाराचे कुलूप तोडल्याचे



रात्री अकरा वाजल्याच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी मंदिराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप कोंयडा तोडून मंदिरात प्रवेश केला. दानपेटी ही मंदिराच्या समोरच गाभाऱ्यात असल्याने चोरट्याने दानपेटी कटरच्या साह्याने तोडून त्यातील मोठी रक्कम लंपास दिसून आले. त्यानंतर ग्रामस्थ व पुजाऱ्यांना दानपेटी फोडल्याची जाणीव झाली. दानपेटी पाहिल्यानंतर दानपेटीच्या उजव्या बाजूची बाजू कटरच्या साह्याने फोडून त्यातील तीन ते चार महिन्यापूर्वी जमा झाल्याची रक्कम अज्ञात चोरट्यांनी लंपास केली.

दोन महिन्यात लिंपणगावात चोरीचे प्रमाण वाढले पोलिसांनी सतर्क रहावे ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार लिंपणगाव हे मोठ्या लोकसंख्येचे गाव असून या गावात अनेक छोट्या मोठ्या चोऱ्या गेल्या दोन महिन्यापासून होताना दिसत आहेत. काही ग्रामस्थांच्या शेळ्या चोरीला गेल्या आहेत त्याबरोबरच छोटे-मोठ्या चोऱ्या देखील चोरट्यांकडून होत आहेत. तर गावातील सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयाचे देखील सीसीटीव्ही कॅमेरे अज्ञात चोरट्यांनी गायब केल्याची माहिती देखील ग्रामस्थांमधून समजली. गाव परिसरातील चोरीला आळा घालण्यासारखा श्रीगोंदा पोलिसांनी रात्रीच्या वेळी ग्रस्त वाढवण्याची मागणी देखील ग्रामस्थांमधून होत आहे.

त्यामध्ये एक चोरटा दानपेटीतील रक्कम चोरी करताना सीसीटीव्ही मध्ये कैद झाला आहे. पुजाऱ्यांनी गावचे सरपंच सदस्य व यात्रा कमिटीला दानपेटी फोडण्याची माहिती दिल्यानंतर गावातील ग्रामस्थ कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने मंदिराकडे घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर या कार्यकर्त्यांनी श्रीगोंदा पोलिसांशी संपर्क साधून घडल्या घटनेची माहिती दिली. त्यानंतर काही वेळातच श्रीगोंदा पोलीस स्टेशनचे पोलीस नाईक ज्ञानदेव भागवत व पोलीस कॉन्स्टेबल मनोज साखरे हे मंदिरातील चोरीच्या ठिकाणी घटनास्थळी दाखल झाले. फोडलेल्या दानपेटीची पाहणी केल्यानंतर चोरट्यांनी पुरावा नष्ट करण्यासाठी सीसीटीव्हीची स्क्रीनची केबल काढून दानपेटीची तोडफोड केली. असल्याचे पोलीस व उपस्थित ग्रामस्थांच्या निदर्शनास आले. त्यामुळे तपासात काही वेळ अडचण आली. परंतु गावातीलच सीसीटीव्ही ऑपरेटरला बोलावून घेतल्यानंतर स्क्रीनची वायर जोडण्यात आली. त्यानंतर सीसीटीव्हीतील फुटेज पाहिल्यानंतर एक चोरटा मंदिरात प्रवेश करत दानपेटी फोडत असल्याचे फुटेजमध्ये देखील पोलिसांना मिळाले आहे. आता सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरटे जेरबंद करण्याचे आवाहन पुढे असणार आहे. या घटनेचा श्रीगोंदाचे पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक ज्ञानदेव भागवत व पोलीस कॉन्स्टेबल मनोज साखरे हे पुढील तपास करत आहेत.

# उद्याचा भारत घडवण्यासाठी स्वत:ला सिद्ध करा : डॉ. मनीषा खेडकर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :-** आयुष्याच्या वेगळ्या वळणावर असताना भरकटत न जाता योग्य दिशेने मार्गक्रमण करत उद्याचा भारत घडवण्यासाठी स्वतःला सिद्ध करा.उंच भरारी घेण्याचे हेच वय असल्याने योग्य ध्येय ठेऊन मार्गक्रमण करा असा सल्ला डॉ. मनीषा खेडकर यांनी केले नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोशिएन व बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने डॉक्टर्स डे निमित्त आयोजित केलेल्या तारुण्यात प्रवेश करताना या विषयवार आयोजित व्याख्यान प्रसंगी डॉ.खेडकर बोलत होत्या.यावेळी प्राचार्य डॉ.बबन चौरे,डॉ.श्रीधर देशमुख,डॉ. सचिन गांधी,डॉ.अजय भंडारी,डॉ. सुहास उरणकर,डॉ. जगदीश मुने,डॉ. सोनाली भंडारी,डॉ. अंबिका वाघ,प्रा.सुरेखा चेमटे,प्रा. आशा पालवे व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.डॉ.खेडकर म्हणाल्या की,तारुण्यात प्रवेश करताना आपल्या शरीराचे ज्ञान




आपल्याला आवश्यक आहे.याच काळात अनेक भावनिक बदल आपल्यात घडत असले तरीही या बदलाला कसे सामोरे जायचे हे ठरवणे आपल्या हातात असते. सुंदर दिसण्याच्या नादात वाहवत जाऊ नका.स्वतःच्या आजारा विषयी गुगल वर माहिती न घेता आपल्या आई वडील व डॉक्टरशी संवाद साधा.शारीरिक आरोग्या बरोबरच मानसिक आरोग्यही खूप महत्वाचे असल्याने नियमित योगा,प्राणायाम करत जा.तुमच्या मध्ये प्रतिकारशक्ती जर चांगली असेल तर अनेक आजारांवर सहज मात करता येते.स्त्री जर स्वतःच्या पायावर उभी राहिली तर तिचे मत कुटुंबात विचारले जात असल्याने स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा यशस्वी प्रयत्न करा. समाज व्यवस्थेत स्त्रीला सुद्धा एक स्थान असते हा विचार मनात बिंबवा. वयाच्या याच टप्प्यात आपल्याला कशात रुची आहे व आपल्याला नेमके काय व्हायचे हे ठरवून त्या दिशेने वाटचाल करा.स्वतःचे संरक्षण कसे करायचे याची जाणीव असली कि अनेक समस्यांवर तुम्ही मात करू शकता.आपण केलेल्या कृत्यामुळे आई वडिलांची मान खाली जाईल अशा गोष्टी करणे टाळा.उंच भरारी घेण्याचे हेच वय असल्याने योग्य ध्येय ठेऊन मार्गक्रमण करा असा सल्ला डॉ. खेडकर यांनी दिला.प्रास्ताविक डॉ. श्रीधर देशमुख सूत्रसंचालन प्रा. सुरेखा चेमटे तर आभार प्रा. आशा पालवे यांनी मानले.

द•ख•ल

## महिलांकडून तूप विक्रीच्या बहाण्याने चोरी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**तळेगाव ढमढेरे, प्रतिनिधी:** जातेगाव बुद्रुक (ता. शिरुर) येथे तूप विक्रीसाठी आलेल्या दोघा महिलांनी जबदस्तीने घरात शिरुर घरातील देव्हाऱ्यातील देवीच्या अंगावरील दागिने चोरुन नेणाऱ्या महिलांना पोलीस पाटील व युवकांनी सतर्कतेने पकडत पोलिसांच्या ताब्यात दिले असून असून गिता रमेश एकणार व दुर्गा संजय भिसे असे सदर महिलांची नावे आहेत. जातेगाव बुद्रक (ता. शिरुर) येथील जनाबाई उमाप या घरात जेवण करत असताना दोघी महिला तूप विक्रीसाठी आल्या त्यांनी जनाबाई यांना तूप घ्यायचे का असे म्हणत घरात शिरल्या आणि आम्हाला देवाचे दर्शन घेऊ द्या असे म्हणत देवघराजवळ जाऊन गडबडीने निघून गेल्या नंतर जनाबाई यांनी लगेच देवघरात पाहणी केली असता देवीच्या अंगावरील दागिने नसल्याचे लक्षात आल्याने जनाबाई यांनी पोलीस पाटील चित्रकला इंगवले यांना माहिती दिल्याने त्यांनी महेंद्र उमाप, राहुल क्षीरसागर, महेश मासळकर, मच्छिंद्र उमाप, महेश नवगिरे, अजित पवार यांच्या मदतीने सदर महिलांचा गावामध्ये शोध घेतला असता महिला मिळून आल्या दरम्यान महिला उडवाउडवीची उत्तरे देऊ लागल्याने पोलीस पाटील चित्रकला इंगवले यांनी महिलांची झडती घेतली असता त्यांच्याकडे चोरीचे दागिने मिळून आल्याने नागरिकांनी महिलांना रंगेहात पकडत पोलिसांच्या ताब्यात दिले, याबाबत जनाबाई दिनकर उमाप (रा. जातेगाव बुद्रुक ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी गिता रमेश एकणार (वय ३५ वर्षे) व दुर्गा संजय भिसे (वय ३५ वर्षे दोघी रा. नाग मंदिर जवळ कळंब ता. यवतमाळ जि. यवतमाळ) या दोघी महिलांवर गुन्हे दाखल केले .

## रास्तापेठ येथे महावितरणचा ‘हिरकणी कक्ष’

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** रास्तापेठ येथील महावितरणच्या परिमंडल कार्यालयात स्तनता माता महिला कर्मचाऱ्यांसाठी तसेच अभ्यागत महिला मातांसाठी ‘हिरकणी कक्ष’ सुरु करण्यात आला आहे. महावितरणचे मुख्य अभियंता सुनील काकडे यांच्याहस्ते सोमवारी (३० जून) दुपारी या हिरकणी कक्षाचे उद्घाटन करण्यात आले. रास्तापेठ येथे महावितरणचे परिमंडल कार्यालय तसेच त्यांतर्गत येणारी इतरही अनेक कार्यालये आहेत. त्यामुळे येथे महिला कर्मचाऱ्यांची व विविध कामानिमित्त येणाऱ्या अभ्यागत महिलांची संख्याही मोठी आहे. महिलांची गरज व अडचण लक्षात घेऊन महावितरणने हिरकणी कक्षाची सुरुवात केली आहे. या कक्षात आवश्यक सर्व सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.

## सौरभ कुंजीर यांची पुरंदर राष्ट्रवादीच्या खजिनदारपदी निवड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**माळशिरस;** पुरंदर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)पक्षाच्या खजिनदार पदी वाघापूर गावचे माजी उपसरपंच सौरभ शेखरबापू कुंजीर यांची निवड करण्यात आली. तालुक्यातील प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकीत निवडीचे पत्र पक्षाचे जिल्हाध्यक्ष जगन्नाथबापू शेवाळे यांच्या हस्ते देण्यात आले. अशी माहिती पुरंदर तालुका अध्यक्ष माणिकराव झेंडे पाटील यांनी दिली. सौरव कुंजीर कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे येथील आडते असोसिएशनचे उपाध्यक्ष आहेत. तसेच पुणे येथील मार्केट यार्डातील विशाल नागरी सहकारी पतसंस्थेचे ते चेअरमन आहेत.

## झापवाडीत कृषीकन्यांकडून कृषी दिन उत्साहात

**सोनई** - झापवाडी ता. नेवासा:- झापवाडी येथे दिनांक १ जुलै रोजी कृषी कन्याकडून कृषी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यात त्यांनी कृषी दिनाचे महत्त्व शेतकऱ्यांना तसेच शालेय विद्यार्थ्यांना सांगितले . यादरम्यान कृषीकन्यांकडून वृक्षारोपण करण्यात आले व मोठ्या जल्लोषात घोषणा देत प्रभात फेरी काढण्यात आली. त्यात शालेय विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसादही मिळाला. या कार्यक्रमात सरपंच तुकाराम जरे व इतर शेतकरी बांधव उपस्थित होते. कार्यक्रमांमध्ये प्रगतशील शेतकरी यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. हरी मोरे ,उपप्राचार्य प्रा. सुनील बोरुडे, कार्यक्रम समन्वयक डॉ.अतुल दरंदले आणि कार्यक्रम अधिकारी डॉ. निर्मला विधाते यांचे मार्गदर्शन लाभले अशी माहिती कृषी कन्यांनी दिली. या उपक्रमासाठी कृषी कन्या दिप्ती हिवाळे, हुंडारे विद्या, ननवरे सिद्धी, जाधव वैष्णवी व काळे ज्योती यांनी सहभाग घेत मोठ्या उत्साहात कार्यक्रम साजरी केला.



# वडगाव डाळ ग्रामपंचायत झाली डिजिटल

### मिळकतीची सर्व माहिती घरबसल्या मिळणार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**भोर :** पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या संकल्पनेतून व भोरचे गटविकास अधिकारी किरणकुमार धनवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली वडगाव डाळ (ता. भोर) ग्रामपंचायतीने शासनाच्या विविध उपक्रमांत सहभागी होत तालुक्यातील १५६ ग्रामपंचायतीमधून डिजिटल ग्रामपंचायत होण्याचा बहुमान मिळविला आहे . ग्रामपंचायतीकडून गावातील गृहस्वामिनी अंतर्गत सर्व महिलांचा सन्मान केला आहे.

गावातील प्रत्येक घर हे महिलेच्या नावावर केले असून, प्रत्येक घरावर डिजिटल क्यूआर कोडची पाटी बसविण्यात आली आहे. त्यामुळे गावातील मालमत्ता धारकांना ग्रामपंचायतीमधील सर्व माहिती घरबसल्या मिळणार आहे. पाटीमधील क्यूआर कोडद्वारे त्या घरमालकाला त्याच्या मिळकतीची ग्रामपंचायत दप्तरामधील सर्व माहिती मिळणार असून, घरपट्टी, पाणी पट्टी व इतर करांबाबत माहिती मिळणार आहे. क्यूआर कोड स्कॅन करून ग्रामस्थ केव्हाही माहिती घेऊ शकतात तसेच भरणादेखील करू शकतील. घराची घरपट्टी, पाणीपट्टी व इतर कर भरला आहे का नाही, चालूवर्षीचा कर किती हे पाहून तो कर देखील क्यूआर कोडद्वारे ऑनलाइनभरता येणार आहे. सरपंच वनाथ चौधरी,ग्रामपंचायत अधिकारी परमेश्वर खटके, उपसरपंच शुभम उल्हाळकर, सदस्य सुधीर खोपडे, संदीप गायकवाड, विद्या डाळ,वंदना चौधरी ,पोर्णिमा बर्के, मीना शेडगे,रूपाली बरदाडे ,आबासाहेब कुमठे यांनी पुढाकार घेत उपक्रम यशस्वी राबविला आहे. नागरिकांचे सर्वच व्यवहार आता ऑनलाइन होत आहेत तर मग ग्रामपंचायतीने मागे का राहायचे. कर क्यूआर कोडद्वारे ऑनलाइन भरता येणार आहे. भरलेल्या कराची पावतीदेखील ऑनलाइन मिळणार आहे. - किरणकुमार धनवाडे गटविकास अधिकारी,भोर ग्रामपंचायत डिजिटल झाली असल्यामुळे धावपळीच्या युगात गावातील नागरिकांचा ग्रामपंचायतीमध्ये जाऊन कर भरण्यासाठी हेलपाटे मारण्यासाठी लागणारा वेळ वाचणार आहे.ग्रामपंचायतीच्या वतीने असे क्यूआर कोड केल्यावर कर वसुलीलादेखील चांगला प्रतिसाद मिळत आहे. वनाथ चौधरी, सरपंच, वडगाव डाळ (ता.भोर) क्यूयार कोडमुळे घरमालकाकडे त्याने भरलेल्या कराची माहिती अद्यायावत राहणार आहे. सर्व कर भरलेले वर्षानुवर्षांचे रेकॉर्ड यामध्ये संग्रहित राहणार असून, जुन्या काही वर्षांच्या पावत्या सांभाळण्याची गरज भासणार नाही. बाहेरगावी कामधंद्यानिमित स्थलांतरित झालेल्या ग्रामस्थांना गावातील मिळकतीचा कर ऑनलाइन भरण्याची सोय उपलब्ध केली असल्याने १०० टक्के कर वसुली होण्यास मदत होणार आहे. -परमेश्वर खटके ग्रामपंचायत अधिकारी, वडगाव डाळ (ता .भोर)

## विद्यार्थ्यांनी अनुभवली वारकरी परंपरेची भक्तीमय शिदोरी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** ध्यास फाउंडेशन संचलित महर्षि वाल्मिकी बालकमंदिर, महर्षि वाल्मिकी विद्यावर्धिनी, डॉ.माधवराव सानप विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे आषाढी पालखी सोहळ्यानिमित्ताने पारंपरिक पद्धतीने आणि भक्तिभावाने भरलेला पालखी सोहळा आयोजित करण्यात आला. वारकरी वेशातील शेकडो विद्यार्थी ‘विठ्ठल-विठ्ठल’चा गजर करत शाळेच्या प्रांगणात नाचत-गात फेरी काढताना पाहून वातावरण पूर्णतः भक्तिरसात न्हालं होते. सोहळ्याची सुरुवात संस्थेच्या संचालिका अक्षता कुलकर्णी यांच्या हस्ते पालखी पूजनाने झाली. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत आषाढी वारीचे ऐतिहासिक व आध्यात्मिक महत्त्व समजावून सांगितले. ‘‘वारी म्हणजे केवळ चालणं नव्हे, ती भक्ती, शिस्त, एकात्मता आणि समर्पण यांची शाळा आहे,‘‘ असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये आध्यात्मिक आणि सांस्कृतिक जागृती घडवली.



विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान केली होती, मुलांनी डोक्यावर टोपी, कपाळी गंध, गळ्यात तुळशीमाळ तर मुलींनी नऊवारी साड्या नेसून वारकरी परंपरेचं दर्शन घडवलं. टाळ - मृदंगाच्या निनादात, अभंग आणि भजनांच्या गजरात, शाळेच्या प्रांगणात एक मिनी वारीच साकारली गेल्यासारखं भासत होते. विद्यार्थ्यांनी संतांच्या अभंगांवर ताल धरत नृत्य केलं. महिला शिक्षक व विद्यार्थिनींनी उत्स्फूर्तपणे फुगडी खेळून कार्यक्रमात रंग भरला. टाळांच्या गजरात साकारलेली ही पालखी वारी विद्यार्थ्यांसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनिषा दरेकर यांनी केले. तर शाळेतील शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी वर्गाने कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष मेहनत घेतली.

## खिस्ती समाजाच्यावतीने राहुरीत आज आक्रोश मोर्चा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रतिनिधी - राहुरी** सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यातील कुपवाड येथे ऋतुजा राजगे नावाच्या गर्भवती तरुणीने आत्महत्या केली. या प्रकरणात धर्मांतरासाठी सासरच्या लोकांनी छळ केल्याचा आरोप आहे. या घटनेच्या निषेधार्थ आयोजित मोर्चा दरम्यान गोपीचंद पडळकर यांनी ख्रिश्चन धर्मगुरूंविरोधात आक्षेपार्ह वक्तव्य केले. त्यांनी धर्मांतरासाठी गावात येणाऱ्या ख्रिश्चन पाद्रींना सैराट करा, आणि जो हे करेल त्याला मी स्वतः ११ लाखांचे बक्षीस देईन असे विधान केले. या वक्तव्याने ख्रिश्चन समाजात संताप आणि भय निर्माण झाले असून, त्यांनी याला हिंसाचाराला चिथावणी देणारे वक्तव्य ठरवले आहे. या वक्तव्याच्या निषेधार्त २ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वाजता राहुरी (वाय.एम.सी ग्राउंड ते तहसील कार्यालय ) मोर्चाचे नियोजन केलेले आहे तरी सर्व समाज बांधवानी व सर्व ख्रिस्ती व बहुजन संघटनाणी या मोर्चास उपस्थित राहावे असे आव्हान आयोजकांचा वतीने करण्यात आले आहे.

## साई नामाच्या गजरात साई पालखीचे ग्रामस्थांकडून स्वागत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**रांजणगाव गणपती/-** गुरुपौर्णिमेनिमित्त श्री क्षेत्र शिर्डी येथे चाललेल्या साई पालखी सोहळ्याचे कोंढापुरी, ता.शिरुर येथे मंगळवारी, दि.१ सकाळी 'ओम श्री साईनाथाय नमः' च्या गजरात ग्रामस्थांनी मोठया उत्साहात व भक्तिमय वातावरणात स्वागत केले. शिक्रापूर येथील रात्रीचा मुक्काम आटोपून कोंढापुरी येथील कात्रज डेअरी जवळील राम उद्योग समुहाच्या प्रांगणात सकाळी १० वाजता पालखीचे आगमन झाल्यानंतर महिला, ग्रामस्थ, भाविक व हजारो साईभक्तांनी साई पालखीचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी पालखी सोहळा समितीचे अध्यक्ष रमेश भोसले व सचिव मंदार शहाणे यांचा युवा उद्योजक संदीप पंदरकर व राम ग्रुप ऑफ कंपनीचे विनय गायकवाड यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला.या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते स्वप्नील गायकवाड,उद्योजक अजय गायकवाड,नितीन गायकवाड, विक्रम पाचुंदकर, अजित इटनर,अमर गायकवाड, संजीव नरवडे,अजय जगदाळे,सरपंच अपेक्षा गायकवाड यांसह ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.यावेळी राम ग्रुप ऑफ कंपनीच्या वतीने पालखी सोहळ्यातील सहभागी साई भक्तांना आणि उपस्थित ग्रामस्थांना खिचडी, लाडू, चहा व पाणी यांचे वाटप करण्यात आले दरम्यान, दरवर्षी



कोंढापुरी, ता.शिरुर येथे श्री साई पालखीचे ग्रामस्थांनी स्वागत करत दर्शन घेतले.
-पोपट पाचंगे, रांजणगाव गणपती.

गुरुपौर्णिमा उत्सवापूर्वी या पालखीचे आयोजन केले जात असून, यंदा पालखी सोहळ्याचे हे ३७ वे वर्ष आहे. पालखी मार्गावर समितीच्या वतीने व्यसनमुक्तीचे उपक्रम राबविण्यात येत असल्याचे अध्यक्ष भोसले व शहाणे यांनी यावेळी सांगितले.दरम्यान, या साई पालखीचे रांजणगाव गणपती, कारेगाव,फलकेमळा, सरदवाडी येथील ग्रामस्थांनी स्वागत करत साईंचे मनोभावे दर्शन घेतले.

## समता पतसंस्थेच्या ठेवी व कर्जवाटपात भरीव वाढ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव :** समता नागरी सहकारी पतसंस्थेच्या तिमाही आर्थिक स्थितीचा आढावा नुकताच संस्थेचे संचालक संदीप कोयटे यांनी संस्थेचे चेअरमन ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत जाहीर केला. यावेळी संस्थेच्या ठेवी आणि कर्ज वाटपात झालेली उल्लेखनीय वाढ स्पष्ट करण्यात आली. गेल्या तीन महिन्यांच्या कालावधीत संस्थेच्या ठेवीत तब्बल १४ टक्के, म्हणजे ३६ कोटी ४४ लाख रुपयांची वाढ झाली असून १०७३ कोटी २४ लाख इतक्या ठेवी झाल्याची माहिती संचालक संदीप कोयटे यांनी दिली. ठेवीत झालेल्या या भरीव वाढीबरोबरच एकूण कर्ज वाटपामध्ये तीन महिन्यात ४१ कोटी २५ लाख रुपयांची वाढ झाली असून, संस्थेचे एकूण कर्ज वाटप ८०९ कोटी ७९ लाख इतके झाले आहे. विशेष बाब म्हणजे, गत तीन महिन्यात झालेल्या एकूण कर्ज वाटपापैकी ५४३ कोटी, म्हणजे ६७ टक्के कर्ज सोनेतारण स्वरूपातील असून, एकूण सोनेतारण कर्ज वाटपात गत तीन महिन्यात ४४ कोटी ३६ लाख रुपयांची वाढ झाली आहे. ‘‘सोनेतारण कर्ज हे जगातील सर्वात सुरक्षित कर्ज समजले जाते. तसेच संस्थेची विविध बँकांमधील गुंतवणूक २५७ कोटी ३८ लाख इतक्या रुपयांची असून मोबाईल बँकिंग, पेपरलेस बँकिंग, ऑडिट कंट्रोल रूम, सेल्फ बँकिंग प्रणाली, व्हाउचरलेस प्रणाली या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या अधिकाधिक वापरामुळे संस्थेच्या समता लिक्विडिटी बेस्ड प्रोटेक्शन स्कीम अंतर्गत ९९.८८ ठेवीदारांच्या ५० लाख रुपयांपर्यंतच्या ठेवी सुरक्षित झाल्या आहेत,‘‘ असे संस्थेचे जेष्ठ संचालक जितूभाई शहा यांनी सांगितले.

## शिकारीचा पाठलाग करत बिबट्या आला दारात, ज्येष्ठ दांपत्य थोडक्यात बचावले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**निरगुडसर** निरगुडसर ता. आंबेगाव येथील दांगटवस्ती येथे शिकारीच्या शोधात मांजराचा पाठलाग करताना बिबट्या घराच्या दारात आला असल्याची घटना सोमवार दि. ३० रोजी रात्री ८ वाजता घडली आहे. घरात असलेल्या जेष्ठ दांपत्य यांनी जोरजोरात आरडा ओरडा केल्याने बिबट्या दरवाजातूनच माघारी फिरल्याने ज्येष्ठ दाम्पत्य थोडक्यात बचावले आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की निरगुडसर दांगटवस्ती येथे सुरेश त्रिपती दांगट वय ६५ व त्यांची पत्नी ताराबाई सुरेश दांगट वय ६० हे राहत असून त्यांची मुले कामानिमित्त मुंबई या ठिकाणी असतात. रात्री आठ वाजताच्या दरम्यान सुरेश दांगट व त्यांची पत्नी घरात बसले असताना त्यांची पाळलेली दोन मांजरे घराबाहेर होती. घराच्या शेजारी असलेल्या उसाच्या शेतातून शिकारीच्या शोधात आलेल्या बिबट्याने त्यांच्या मांजरांचा पाठलाग केला. त्यावेळी मांजरे घरात पळाली त्याबरोबर बिबट्या देखील मांजरांच्या मागे घराच्या दारापर्यंत पळत आला. सुरेश दांगट घरातून उठून बाहेर जाण्यासाठी निघाले असता त्यांची पत्नी ताराबाई दांगट यांनी त्यांना दरवाजात बिबट्या आहे बाहेर जाऊ नका असे सांगत जोर जोरात आरडाओरडा केला तसेच घरातील काठीने दरवाजावर जोरजोरात मारत मोठा आवाज केल्याने बिबट्या निघून गेला. मात्र घडलेल्या प्रकाराने दांगट पती-पत्नी खूप घाबरले होते. देवाची कृपा म्हणून आम्ही वाचलो असे ताराबाई दांगट यांनी सांगितले. दांगटवस्ती या परिसरात बिबट्याचे वास्तव्य असून दोन दिवसापूर्वी सुरेश दांगट यांच्या घराच्या पाठीमागे शेतात बिबट्या पाहिल्याचे ताराबाई दांगट यांनी सांगीतले. या अगोदर सुरेश दांगट यांची दोन पाळीव कुत्री, एक कालवड, शेजारी राहणारे शिवाजी दांगट यांचे तीन पाळीव कुत्री तर पुष्पाबाई दांगट यांचा



एक पाळीव कुत्रा बिबट्याने आतापर्यंत ठार केले आहे. याबाबत माजी उपसरपंच आनंदराव वळसे पाटील यांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती दिली असता वनरक्षक अश्विनी डफळ, वनकर्मचारी दशरथ मेंगडे यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली आहे. सदर ठिकाणी पिंजरा लावावा अशी मागणी येथील शेतकरी शिवाजी दांगट, कारभारी दांगट, बाळासाहेब दांगट, विशाल दांगट यांनी केली आहे.

## मंचरच्या स्मशानभूमीत अंधश्रद्धेतून जादूटोणा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**निरगुडसर** मंचर ता. आंबेगाव येथील स्मशानभूमीत अंधश्रद्धेला खतपाणी घालणारा जादू टोण्याचा अघोरी प्रकार उघडकीस आला आहे. अंत्यविधी झालेल्या ठिकाणी अज्ञात व्यक्तींनी लिंबू, नारळ, कोहळे, हळदी, कुंकू या विविध वस्तू आढळून आले असून सावडण्यासाठी आलेल्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते. ाबाबत अधिक माहिती अशी की शेवाळवाडी येथील नानाभाऊ श्रीपती थोरात वय ८५ यांचे वृद्धपकाळाने शुक्रवार दि.२७ रोजी निधन झाले होते त्यांचा सावडण्याचा कार्यक्रम तिन दिवसांनी होता. सोमवारी सकाळी दि.३० रोजी थोरात कुटुंबीय, नातेवाईक सावडण्यासाठी आले असता त्यांना अंत्यविधी झालेल्या ठिकाणी राखेत लिंबू, नारळ, कोहाळे, सुरी, बांगड्या, हळदीकुंकू, टाचण्या, धामण इत्यादी वस्तू आढळून आल्या. मंचरच्या स्मशानभूमीत सदर प्रकार घडल्याने खूप थोरात कुटुंबीय नातेवाईक भयभीत झाली असून त्यांनी संताप व्यक्त केला आहे. दरम्यान स्मशानभूमीत वास्तव्य करणारे दोन व्यक्तींनी रात्री दुचाकी वर आलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी गौऱ्या पेटवून त्यात या वस्तू टाकल्या असल्याचे सांगितले. घडलेला प्रकार हा निंदनीय असून समाजात आजही अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात फोफावली असून एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतरही त्याच्याबाबत असे कृत्य केले जात असल्याने घडलेल्या घटनेचा सर्व स्तरातून निषेध व्यक्त होत आहे. दरम्यान स्मशानभूमी परिसरात संरक्षण भिंत, जाळी नसल्याने कोणीही ये - जा करते त्यामुळे स्मशानभूमीला संरक्षण भिंत, जाळी तसेच स्मशानभूमी परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे अशी मागणी नागरिक करू लागले आहेत. तसेच मंचर नगरपंचायत च्या वतीने ३० ते ४० लाख रुपये खर्च करून नागरिकांसाठी शवदाहिणी बांधण्यात आली असून काही कारणास्तव ही शवदाहीनी बंद पडली आहे. शवदाहिनी सुरू असती तर असा प्रकार घडला नसता त्यामुळे ही शदाहिनी देखील नगरपंचायत प्रशासनाने लवकरात लवकर सुरू करावी अशी मागणी मंचर ग्रामस्थांनी केली आहे.



## खरीप हंगाम २०२४ पिकवमा नुकसान भरपाई तक्रार निवारण कॅम्प संपन्न

**श्रीरामपूर :** स्वतंत्र भारत पक्ष, शेतकरी संघटना, महिला आघाडी अहिल्यानगर आयोजित पीकविमा नुकसानभरपाई तक्रार निवारण कॅम्प दि. १ जुलै रोजी ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी ऑफिस येथे झाला यात श्रीरामपूर तालुक्यातील अडीच हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी त्यांच्या तक्रार निवारण करण्यासाठी उपस्थिती लावली . श्रीरामपूर तालुक्याला पीकविमा नुकसानभरपाई ४ निकषपैकी स्थानिक नैसर्गिक आपत्ती आणि पीक काढणी पश्चात नुकसान या दोन निकष नुसार भरपाई मंजूर होऊन देण्यात येणार आहे त्यापैकी स्थानिक नैसर्गिक आपत्तीचे नुकसान भरपाई देण्यात आली आहे तर काढणी पश्चात नुकसान भरपाई अद्याप मिळाली नाही. अनेक शेतकऱ्यांचे आधार लिंक बँक खात्यात पैसे जमा झाले आहेत त्यांनी आपल्या आधार नंबरशी लिंक असलेल्या बँक खात्यात पैसे जमा झाल्याची खात्री करून घ्यावी. पीककाढणी पश्चात नुकसान,स्थानिक नैसर्गिक आपत्ती भरपाई चे तालुक्यात साधारण २ हजार शेतकऱ्यांना २ कोटी पेक्षा जास्त रक्कम विमा कंपनी कडून घेणे आहे तर नगर जिल्ह्यात सुमारे १० कोटी पेक्षा जास्त रक्कम घेणे आहे ,अनेक शेतकऱ्यांचे नुकसान भरपाई डावे ७२ तासांचे आत तक्रार दाखल करण्याच्या नियम मुळे नाकारण्यात आले आहेत कारण बऱ्याच अशिक्षित शेतकऱ्यांना तक्रारी दाखल करता आल्या नाहीत तर काहींच्या तक्रारी चुकीचं कारण दिल्यामुळे नाकारण्यात आल्या बऱ्याच शेतकऱ्यांना ७२ तास विमा कंपनी चे टोल फ्री क्रमांक सतत व्यस्त असल्याने तक्रार ७२ तासांच्या आत दाखल करता आल्या नाहीत जिल्ह्यातील अशा शेतकऱ्यांसाठी शासनाने तक्रार करण्याची अट शिथिल करून भरपाई देणे गरजेचे आहे कारण एकच गट नंबर मधील एका शेतकऱ्याने तक्रार दाखल केली त्याला भरपाई देण्यात आली परंतु त्याच गटातील दुसऱ्या शेतकऱ्याला तक्रार दाखल करता आली नाही त्यांना भरपाई देण्यात येणार नाही हा खूप मोठा अन्याय होणार आहे त्यामुळे शासनाने तक्रार दाखल करण्याची अट शिथिल करून नगर जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी स्वतंत्र भारत पक्ष शेतकरी संघटना अहिल्यानगर ने केली आहे.शासनाकडे पीकविमा कंपन्याचे पीकविमा हफ्त्याचे सुमारे१४०० कोटी रुपये घेणे आहे ती रक्कम शासनाने पीकविमा कंपन्यांना दिल्यावर विमा कंपन्या काढणी पश्चात नुकसान भरपाई शेतकऱ्यांना देणार असल्याचे विमा कंपनी अधिकाऱ्यांनी सांगितले आहे स्वतंत्र भारत पक्ष,शेतकरी संघटना, महिला आघाडी ने शासनाला ही १४०० कोटींची रक्कम तत्काळ विमा कंपन्याना देण्याची मागणी केली आहे कारण शासनाने १४०० कोटी रुपये दिल्या शिवाय राहिलेल्या शेतकऱ्यांना भरपाई देण्यात येणार नाही तेव्हा शासनाने आता खरीप हंगाम सुरू झाला असल्याने शेतकऱ्यांना पैशांची अत्यंत निकड असल्याने विमा कंपन्याना देणे असलेले १४०० कोटींचा विमा हफ्ता तत्काळ जमा केल्यास खरीप हंगाम पिकांचे व्यवस्थापन करण्यास मोलाची मदत होईल शासनाने हफ्त्याचे पैसे दिले तरच विमा कंपनी शेतकऱ्यांना भरपाईचे पैसे देणार असल्याचे विमा कंपनी अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. या प्रसंगी स्वतंत्र भारत पक्षाचे जिल्हाध्यक्ष नीलेश शेडगे , महिला आघाडी जिल्हाध्यक्ष श्रीमती सुनीताताई वानखेडे ,महिलातालुकाध्यक्ष सौ कोमल वानखेडे ,उपाध्यक्ष नवनाथ दिघे ,अंबादास गमे , अशोक आव्हाड ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीचे श्रीरामपूर अधिकारी स्वप्नील मोकळ उपस्थित होते. हा तक्रार निवारण कॅम्प आयोजित करण्यासाठी श्रीरामपूर तालुका कृषी अधिकारी उल्हास राक्षे विशेष सहकार्य केले.

द•ख•ल

## वाघोली येथे पाच दिवशीय योग संस्कार शिबिर संपन्न

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** जागतिक योग दिनाचे औचित्य साधून आदर्श गाव वाघोली चे सरपंच उमेशभाऊ भालसिंग यांच्या नियोजनात आणि योगगुरु भागवतजी खामकर यांच्या प्रशिक्षणातून आदर्श गाव वाघोली च्या आदर्श जिल्हा परिषद शाळेच्या आवारात हे योग्य संस्कार शिबिर पार पडले. वाघोली , दिंडेवाडी, चव्हाणवाडी तसेच पंचक्रोशीतील अनेक ग्रामस्थांनी पहाटे येथे उपस्थित राहून या योग स्कार शिबिरात सहभाग नोंदवला.पुरुषांसोबत महिलांनी या शिबिरास हजेरी लावली.

भविष्यात निरोगी आणि सुदृढ जीवन जगण्यासाठी योग प्राणायामाची किती आवश्यकता आहे , कोणत्या आजारासाठी कोणते प्राणायाम आपण करावे याविषयी अनमोल मार्गदर्शन गुरुजींच्या माध्यमातून मिळाले.या पाच दिवशी योग संस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी सर्व साधकांच्या वतीने गुरुजींचा यथोचित सन्मान करण्यात आला.

या शिबिरास ज्येष्ठ मंडळींनी तसेच तरुणांनी, महिलांनी मोठ्या माणात उत्साहात सहभाग नोंदवला.



## अनिल बागुल यांचा बहुजन समाज पार्टी पक्षात प्रवेश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर:**राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त कोल्हापूर येथील आयोजित कार्यक्रमामध्ये बहुजन समाज पार्टीच्या वतीने अभिवादन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्रातील गावागावातून, खेड्यापाड्यातील बहुजन समाज पार्टीच्या भीमसैनिकांनी आणि माता भगिनींनी हजेरी लावली होती. या भव्यदिव्य कार्यक्रमाला महाराष्ट्र समन्वयक माजी.खा. राजाराम , महाराष्ट्र प्रभारी . ॲड. सुनिल डोंगरे , बहुजन समाज पार्टी पुणे झोन प्रभारी माजी शिक्षण उपसंचालक तथा महाराष्ट्र सचिव . रामचंद्र जाधव , पुणे झोन प्रभारी .हुलगेश चलवादी , विविध झोन प्रभारी तसेच अहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष सुरेश कांबळे, विविध जिल्ह्यांतील जिल्हाध्यक्ष, जिल्हा प्रभारी . सुनिल ओहळ आदींच्या उपस्थितीत . अनिल बागुल यांचा बहुजन समाज पार्टी या पक्षात जाहीर प्रवेश केला. अनिल बागुल यांचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख तसेच जिल्हा कोषाध्यक्ष या दोन महत्त्वाच्या पदावर नियुक्ती करुन पक्षात आल्याबद्दल स्वागत केले , आणि पक्षाच्या भरीव कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. उपाध्यक्ष शहवाज पठाण, सचिव चंद्रकांत दोंदे, आकाश शेंडे, उमाकांत यादव, विधानसभा अध्यक्ष जाकिरभाई शहा , विधानसभा प्रभारी सुनिल मगर, मच्छिंद्र ढोकणे, बबनराव बोरगे, भारत त्रिभुवन, शेंडगे मामा आदि जिल्ह्याचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. यावेळी अनिल बागुल यांनी पक्ष संघटन, पक्ष वाढीसाठी आपण या पुढे कायमच प्रयत्नशील राहून बहुजन समाज पार्टी राष्ट्रीय अध्यक्षा माजी. मुख्यमंत्री मायावती यांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल धन्यवाद दिले.



# बंटी राऊतवर एमपीडीए अंतर्गत कारवाई

## नाशिक मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध, सराईत गुन्हेगारीमुळे नागरिकांमध्ये दहशत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शहर व परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या सराईत गुन्हेगार बंटी उर्फ भावेश अशोक राऊत (वय ३२, रा. माणीक चौक, लाटे गल्ली, अहिल्यानगर) याच्यावर एमपीडीए कायद्यान्वये (चरहरॲरीहींॲर झॲर्शीशपींळेप ेष ृरपसशॲीी अलींर्ळीळींळशी अलीं)

### जिल्हादंडाधिकाऱ्यांचा कठोर निर्णय

कारवाई करत जिल्हा प्रशासनाने त्यास नाशिकमधील मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध केलं आहे. बंटी राऊतवर कोतवाली व तोफखाना पोलीस ठाण्यांत दरोडा, बलात्कार, मारहाण, खूनाचा प्रयत्न, गावठी कट्ट्याचा वापर, महिलेस लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य अशा स्वरूपाचे तब्बल ११ गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे तो परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण करीत होता. या



गुन्हेगारी पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक प्रताप दराडे (कोतवाली पोलीस ठाणे) यांनी एमपीडीए अंतर्गत प्रस्ताव तयार केला. हा प्रस्ताव उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती व अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे पाठविण्यात आला. त्यांनी याची सखोल पडताळणी करून जिल्हादंडाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे शिफारस केली. त्यानंतर डॉ. आशिया यांनी राऊतच्या गुन्हेगारी वर्तनामुळे सार्वत्रिक सुव्यवस्थेला धोका असल्याचे स्पष्ट करत त्यास स्थानबद्ध करण्याचे आदेश जारी केले. त्यानुसार राऊतला अटक करून नाशिकच्या मध्यवर्ती कारागृहात हलविण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दिनेश आहेर, पोसई तुषार धाकराव, स.फौ. रविंद्र पांडे, पोहेकॉ सुरेश माळी, संदिप पवार, शाहिद शेख, पोकॉ रविंद्र घुंगासे, विशाल तनपुरे, रमिझ आतार, सफौ. महादेव भांड (स्थानीय गुन्हे शाखा) आणि कोतवाली पोलीस ठाण्याचे मपोहेकॉ शिल्पा कांबळे, पोकॉ राहुल मासाळकर यांनी केली. दरम्यान, जिल्ह्यातील वाळू तस्कर, टोळीगठित गुन्हेगारी करणारे, तसेच दहशत निर्माण करणाऱ्यांवर प्रचलित कायद्यांतर्गत कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा जिल्हादंडाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी दिला आहे.

## 'स्नेहबंध'तर्फे रेणुका माता पायी दिंडीचे स्वागत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर -** सनई चौघडे आणि टाळ-मृदंगाचा गजर, राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेले हजारो वारकरी, त्यांच्या हातात असलेले भगवे ध्वज, मुखी विठू नामाचा गजर अशा भक्तिमय वातावरणात संतश्रेष्ठ श्री क्षेत्र मानोरी पालखीचे रविवारी सकाळी शहरातून पंढरपूरकडे प्रस्थान झाले.

या पालखी सोहळ्याचे स्नेहबंध सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी स्वागत केले. रेणुका माता पायी दिंडी सोहळा, श्री क्षेत्र मानोरी पालखी जवळपास ४८० किलोमीटरचा दिवसांचा प्रवास करत पांडुरंगाच्या भेटीसाठी



'स्नेहबंध' तर्फे रेणुका माता पायी दिंडीचे स्वागत करताना अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे

पालखीसोबत वारकरी बांधव पंढरपूरमध्ये पोहोचतील. या संपूर्ण २८ दिवसांच्या प्रवासात अनेक अध्यात्मिक कार्यक्रमांसह गोल रिंगण आणि उभे रिंगण देखील पार पडत आहेत. दिंडी सोहळ्यात असंख्य वारकरी सहभागी झाले आहेत.

## नान्नजला दिंडीतील वारकऱ्यांना पाणी वाटप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** तालुक्यातील नान्नज मध्ये अमळनेर ते पंढरपूर या दिंडीचे आगमन झालेलं असताना या दिंडीतील वारकऱ्यांसाठी आरसीन मोबाईल शॉपचे संचालक नवीद शेख यांच्या वतीने बिसलरी बॉटल चे वाटप करण्यात आले वाटप करत असताना गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते तसेच नान्नजचे माजी सरपंच सुनील हजारे,




संतोष मोहळकर, कानिफनाथ बनकर, हनुमंत शितोळे, शहाजी राऊत, छगन मोहळकर, अशोक मोहळकर, शहाजी फंदाडे, अमर चाऊस, फारुक शेख, लियाकत शेख, शिवाजी पोते, पंडित मोहळकर, व आरसीन मोबाईल नान्नज चे सर्वेसर्वा नवीद शेख यांनी सर्व वारकऱ्यांचे आभार मानले व आपल्या दुकानाच्या वतीने बिसलरी बॉटल वाटप चा कार्यक्रम भक्ती भावाने पार पडलाआंबळनेर ते पंढरपूर ही पायी दिंडी नान्नज या गावांमध्ये गेले वीस वर्षापासून मुक्कामी येत असून दुसऱ्या दिवशी सकाळी पंढरपूर कडे रवाना होत आहे.

## श्रीगोंदा तालुक्यात ढगाळ वातावरणाबरोबरच आर्द्रा नक्षत्राच्या पावसाच्या सरी बरसल्या

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव:**श्रीगोंदा तालुक्यात मंगळवारी एक जुलै रोजी दिवसभर ढगाळ वातावरण निर्माण होऊन दुपारपासून पावसाच्या सरी बरसल्या साधारण दुपारी तीन वाजल्याच्या पुढे तालुक्यात सर्वत्र पावसाचे आगमन झाल्याचे दिसून आले. तब्बल एक महिन्यानंतर पुन्हा पावसाळी वातावरण तयार झाल्याने या पावसामुळे खरीप हंगामाच्या पिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. दरम्यान रोहिणी व मृग नक्षत्रात पावसाने सर्वत्र जोरदार हजेरी लावली. यावेळी तब्बल आठ दहा दिवस पावसाने जोर धरल्यामुळे खरीप हंगामाच्या पेरणीसाठी मोठा विलंब लागला. त्यानंतर एक महिना पावसाने विश्रांती घेतली. फक्त या कालावधीत ढगाळ वातावरण दिसून आले. त्यामुळे या पिकांच्या पेरण्याहून खुरपने देखील झाल्या. आता जमिनीतील ओल संपुष्टात आल्यामुळे या पिकांना पावसाचे नितांत गरज होती. सद्यस्थितीला २२जून पासून आर्द्रा नक्षत्र सुरू झाले. परंतु या नक्षत्रात पावसाने पूर्णतः पाठ फिरवली. हवामान तज्ञांच्या अंदाजानुसार २७ जुलै ते ३०जुलै पर्यंत जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त केला जात आहे. एक महिना पावसाने विश्रांती घेतल्यामुळे खरिपाची पिके सर्वत्र डौलदार दिसून येत आहेत. आर्द्रा नक्षत्राच्या पावसाने अशीच संततधार सुरू ठेवली, तर पिके आणखी जोमात देऊ शकतात. असे वयोवृद्ध शेतकरी सांगतात.

गेल्या आठ दिवसापासून ढगाळ वातावरण तयार होते परंतु पाऊस कुठेच बरसला नाही. आता एक जुलैपासून पावसाळी वातावरण तयार झाल्यामुळे शेतकऱ्यांना काही अंशी पावसाची अपेक्षा लागून आहे. एक महिन्यांमध्ये अवकाळी पावसानंतर कुठेच दमदार पाऊस दिसला नाही. एक महिन्यांमध्ये कधी ऊन तर कधी ढगाळ वातावरण त्यामुळे कपाशी, बाजरी, उडीद, मका इत्यादी पिकांवर काही अंशी दुष्परिणाम दिसून आल्याचे शेतकरी सांगतात. एक जुलै रोजी संपूर्ण श्रीगोंदा तालुक्यात दुपारपासून ढगाळ वातावरण तयार होऊन पाऊस बरसल्यामुळे सर्वत्र गारवा निर्माण झाला असून, वातावरणात देखील मोठा अमुलाग्र बदल झाल्याचे दिसून आले.

## वाळकीचे आरोग्य केंद्र, आठवडे बाजार सुरळीत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर -** गेल्या आठवड्यात नगर तालुक्यातील काही गावांमध्ये अतिवृष्टी होऊन झालेल्या नुकसानीनंतर रविवारी खा. नीलेश लंके व त्यांच्या सहकाऱ्यांनी त्या-त्या गावांमध्ये जात केलेल्या मदत कार्यामुळे तेथील जनजीवन सुरळीत झाले आहे. गाळाने माखलेले प्राथमिक आरोग्य केंद्र चकाचक करण्यात आल्याने ते सोमवारी सुरळीत सुरू झाले, आठवडे बाजार भरला तर जुंदरे मळयातील रस्ताही सुरू झाला.सारोळा कासार येथील वाहून गेलेला स्मशानभुमीचा भाग भराव टाकून पुर्ववत करण्यात आला. काळे मळयाचा रस्ता दोन पुल दुरूस्त करून सुरळीत करण्यात आला. बारवे मळयातील दत्त मंदिराकडे जाणारा रस्ता तसेच अकोळनेर ते सारोळा शिवरस्ता खा. लंके यांच्या मावळयांनी दुरूस्त केला.भोरवाडीच्या वाळुंबा नदीवरील पडलेला पुल दुरूस्त करण्यात आल्याने खडकवाडी येथील शेतक-यांचे दळणवळण सुरळीत झाले. दुग्ध व्यवसायिकांना डोक्यावर किटली घेऊन दूध संकलन केंद्राकडे जावे लागत होते त्या रस्त्यावरील पुलाचे व खैरेवस्तीकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम करण्यात आल्याने दूध संकलनही सुरळीत झाले. पुल वाहून गेल्याने दळवी वस्तीचा संपर्क तुटला होता, पुलाची दुरूस्ती झाल्याने दळवी वस्तीचेही दळणवळण पुर्ववत झाले.

पारनेर तालुका मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनची आरोग्य वारी

## वारकऱ्यांच्या आरोग्याची सेवा करत जपली सामाजिक बांधिलकी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** पंढरपूर आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर इंदापूर येथे वारकऱ्यांच्या सेवेसाठी पारनेर तालुका मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनतर्फे (झढचझअ) भव्य आरोग्य सेवा शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये अनेक डॉक्टरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत हजारो वारकऱ्यांना मोफत आरोग्य सेवा पुरवली. सकाळी लवकरच सेवा कार्याला सुरुवात करण्यात आली. तपासणी, प्राथमिक औषधोपचार, रक्तदाब, साखर तपासणी यासारख्या सुविधा या शिबिरात उपलब्ध होत्या. ऊन्हा-तान्हात चालत येणाऱ्या वारकऱ्यांना विश्रांती देणे आणि त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे हे या उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट होते. डॉ. अशोक सरोदे, रजनी थोरात, डॉ. उत्तम थोरात, डॉ.भास्करराव शिरोळे, डॉ. स्मिता शिरोळे, सुनंदा झावरे, डॉ. बाळासाहेब झावरे, डॉ. सुभाष मावळे, अनिता श्रीमंदीलकर,



डॉ. दत्तात्रय श्रीमंदीलकर, डॉ. शितल लंके, डॉ. ऐश्वर्या बेलोटे, डॉ. विशाल सुपेकर, डॉ. राहुल कांडेकर, डॉ. अजित खामकर, डॉ. बाळासाहेब घोगरे, डॉ. सुनीता लाळगे, डॉ. प्रकाश लाळगे, डॉ. पांडुरंग थोरात, प्रवीण व्यवहारे, डॉ. गौरी व्यवहारे, डॉ. सोमेश्वर आढाव, डॉ. राजेश थोरात आणि डॉ किरण जाधव यांनी विशेष योगदान दिले. या आरोग्य वारीमुळे वैद्यकीय क्षेत्रातील सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण उभे राहिले आहे. ''वारी म्हणजे ेवळ श्रद्धा नाही, तर सेवाभावही आहे,'' असे मत असोसिएशनचे पदाधिकारी डॉ. सुनिल कदम यांनी व्यक्त केले. असोसिएशन पदाधिकारी डॉ.अजित लंके यांनी सांगितले की गेली अनेक वर्षांपासून वारीतील वारकऱ्यांची सुश्रुषा करण्याचे काम असोसिएशन पदाधिकारी व सदस्य करीत आहेत. दरवर्षी पारनेर तालुक्यातील बहुसंख्य गावचे डॉक्टर मोठ्या संख्येने या पंढरपूर वारीमध्ये सहभागी होऊन जवळपास पन्नास पेक्षा जास्त दिंडी सोहळ्यातील वारकऱ्यांची सेवा करीत असतात अशी माहिती डॉ. लंके यांनी दिली आहे. असोसिएशनचे पदाधिकारी डॉ.बाळासाहेब घोगरे ,ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. अशोकराव सरोदे , डॉ.उत्तमराव थोरात , डॉ भास्करराव शिरोळे आदींनी मनोगत व्यक्त केले. निघोज - अळकुटी जिल्हा परिषद, कान्हूर जिल्हा परिषद गटातील जवळपास शंभर पेक्षा जास्त दिंड्या संत ज्ञानेश्वर माऊली, संत तुकाराम महाराज व संत निळोबाराय पालखी सोहळ्यात सहभागी झाल्या असून इंदापूर व परिसरात पायीवारीतील दिंडी सोहळ्यातील शेकडो वारकऱ्यांवर उपचार करीत व रुग्ण सेवा देत पारनेर तालुका मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनतर्फे (झढचझअ) भव्य आरोग्य सेवा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते अशी माहिती सचिव डॉ. पांडुरंग थोरात यांनी दिली आहे.

## कै.रा .ब .पवार गुरुजी सामाजिक प्रतिष्ठानच्यावतीने शालेय साहित्याचे वाटप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहता:** तालुक्यातील दाढ बुद्रुक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दाढ बुद्रुक येथिल निराधार. हुशार. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना दि. २८जून रोजी कै. रा.ब. पवार गुरुजी बहुउद्देशीय सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने वह्या ,कंपास पेटी ,पेन, पेन्सिल शार्पनर ,खोडरबर इत्यादी शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. त्याप्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष . सुशील पवार प्रा. चंद्रकांत खांडगौरे, कृष्णा तांबे, प्रा. डॉ. चंद्रभान रोकडे, .दाढ बुद्रुक विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे चेअरमन भाऊसाहेब पाळंदे, राजेंद्र टपळे आणि प्रतिष्ठानचे सल्लागार प्रा. डॉ. भाऊसाहेब पवार उपस्थित होते.

प्रास्ताविकेत प्रतिष्ठानचे सल्लागार प्रा. डॉ. भाऊसाहेब पवार यांनी सांगितले की, संस्थेचे ध्येय धोरणे हे व्यसनमुक्ती, पर्यावरण जाणीव जागृती, दत्तक योजना, क्रीडा, सामाजिक विकास, शैक्षणिक विकास इत्यादी क्षेत्रात आज पर्यंत प्रतिष्ठानने भरीव कार्य केलेले आहे. वडील प्राथमिक शाळेत शिक्षक असल्याने आम्हास त्यांची शिकवण व विचार हे अमूल्य ठरले. शिक्षणाचे महत्त्व कळल्याने आम्ही अशा



विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्याचा हा उपक्रम दरवर्षी पार पाडतो. आज पर्यंत जवळजवळ ६०० च्या वर विद्यार्थ्यांना अशा प्रकारचे शालेय साहित्याचे वाटप करण्यात आलेले आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दाढ बुद्रुक येथे माझे शिक्षण झाल्याने मी या शाळेचा माजी विद्यार्थी म्हणून मला अभिमान आहे. म्हणून मी येथील विद्यार्थ्यांना या शालेय साहित्याचे वाटप करण्याचा निर्णय घेतला. तसेच विद्यार्थ्यांना डॉ.पवार यांनी व्यसनमुक्ती व पर्यावरण जाणीव विषयक माहिती व मार्गदर्शन करून शाळेतील विद्यार्थ्यांना वृक्षाचे रोपटे देऊन त्याची देखभाल करण्याचे आव्हान केले. याप्रसंगी प्रा. चंद्रकांत खंडगौरे यांनी देखील प्रतिष्ठानचे कौतुक करून प्रतिष्ठान राबवत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती सखोल पणे विद्यार्थ्यांना दिली. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ पाळंदे यांनी प्रतिष्ठानची प्रशंसा करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री अनाप यांनी करून श्री गंभीरे यांनी आभार मानले.

## १०८ रुग्णवाहिका चालकांचं कामबंद आंदोलन; 'समान काम, समान वेतन'ची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर –** गेल्या अनेक वर्षांपासून आरोग्यव्यवस्थेचा अत्यंत महत्त्वाचा भाग असलेल्या १०८ रुग्णवाहिका सेवेतील चालकांनी अखेर कामबंद आंदोलनाचा मार्ग अवलंबला आहे. सोमवारपासून (१ जुलै) अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर १०८ रुग्णवाहिका चालक युनियनच्या वतीने धरणे आंदोलन सुरू करण्यात आलं असून, 'समान काम, समान वेतन' या मुख्य मागणीसह इतर अनेक प्रश्नांकडे शासन आणि बीव्हीजी कंपनीचे लक्ष वेधण्यात आलं आहे. या आंदोलनात युनियनचे अध्यक्ष अशोक कराळे, उपाध्यक्ष अतुल शिंदे, संजय दरवडे, सतीश शिरसाठ, नितीन चेमटे, शरद अस्वर, संजय ओहोळकर, राहुल वाकचौरे, वाल्मीक शितोळे, संतोष चौधरी, भीमराज मोकाटे, जगन्नाथ खेमनार, आप्पासाहेब झुंबड, किशोर घनवट, सुनील देशमुख, सोमनाथ बांडे आदींसह मोठ्या संख्येने चालक सहभागी झाले आहेत. १३ मे २०२५ रोजी मुंबईतील आझाद मैदानात आंदोलन करून




चालकांनी शासन आणि बीव्हीजी कंपनीकडे आपल्यावरील अन्यायाची कैफियत मांडली होती. त्यावेळी मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेण्याचं आश्वासन देण्यात आलं होतं. मात्र दोन महिन्यांनंतरही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने अखेर कामबंद आंदोलनाचा निर्णय घेतल्याचे चाल ांचे म्हणणे आहे. । आहेत मुख्य मागण्या समान काम, समान वेतन धोरण लागू करावं. २०१४ ते २०१७ पर्यंत कपात केलेला पीएफ रक्कम परत द्यावी. कोविड काळात केलेल्या सेवेसाठी भत्ता मिळावा; शासनाकडून निधी मिळूनही कंपनीने तो दिला नाही. र्व चालकांना आरोग्य विमा संरक्षण मिळावं. वाहनांची देखभाल दुर्लक्षित; रुग्ण व चालकांच्या जीविताला धोका नर्माण. ओव्हरटाईम कामाचा मोबदला मिळावा. कंपनीकडून दुर्लक्षाचा आरोप बीव्हीजी कंपनीकडे वेळोवेळी चर्चा करण्याची विनंती केली, १५ जूनपर्यंत वाट पाहिली. मात्र प्रतिसाद न मिळाल्यामुळेच आंदोलनाचा निर्णय घ्यावा लागला. मागण्या पूर्ण न झाल्यास आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशारा युनियनतर्फे देण्यात आला आहे. रुग्णसेवेवर परिणाम होण्याची शक्यता कामबंद आंदोलनामुळे जिल्ह्यातील रुग्णवाहिका सेवा विस्कळीत होण्याची शक्यता असून, अत्यावश्यक सेवांमध्ये गोंधळ उडण्याची भीती व्यक्त होत आहे. आंदोलन सुरू असतानाही चालकांनी आजवर सेवा सुरू ठेवली होती, मात्र प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने हा निर्णय घेतल्याचं स्पष्ट करण्यात आलं.

## महानगरपालिकेची विक्रमी २७ कोटींची करवसुली

कर न भरलेल्या मालमत्ताधारकांवर आजपासून २ टक्के दंडाची कारवाई सुरू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महानगरपालिकेने एप्रिल ते जून या सर्वसाधारण कर सवलत कालावधीत तब्बल २७ कोटी २७ लाख रुपयांची विक्रमी वसुली केली आहे. शहरातील ३९,५१८ मालमत्ताधारकांनी सवलतीचा लाभ घेत कर भरून प्रशासनाच्या जनजागृती मोहिमेला चांगला प्रतिसाद दिला आहे. दरम्यान, १ जुलैपासून कर न भरणाऱ्यांवर दरमहा २ टक्के शास्ती (दंड) आकारणी सुरू करण्यात आली आहे. लवकरच मोठ्या थकबाकीदारांविरोधात थेट कारवाई केली जाणार असल्याचा इशारा आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिला आहे. एप्रिल व मे महिन्यांत १० टक्के सवलत दिल्याचा लाभ २३,४७८ नागरिकांनी घेतला, तर जून महिन्यात ८ टक्के



सवलतीसाठी १६,०४० जणांनी पुढाकार घेतला. एकूण २८.१३ कोटी रुपयांच्या कर संकलनात ८६.३२ लाख रुपयांची सवलत देण्यात आली असून, उर्वरित २७.२७ कोटी रुपयांचा कर प्रत्यक्ष महानगरपालिकेकडे जमा झाला आहे. मागील वर्षीपेक्षा ३ कोटींनी वाढ महानगरपालिकेने यंदा कर वसुलीवर विशेष भर देताना प्रबळ जनजागृती केली होती. परिणामी, मागील वर्षीच्या तुलनेत यंदा ३ कोटी रुपयांनी अधिक कर संकलन झाले आहे. यापूर्वी एप्रिल ते जूनमध्ये अनुक्रमे २२ कोटी आणि २४ कोटी रुपयांची वसुली झाली होती. नियमित करदात्यांचे आभार नियमित कर भरून शहराच्या विकासात हातभार लावणाऱ्या सर्व करदात्यांचे मन:पूर्वक आभार, असे गौरवोद्गार आयुक्त डांगे यांनी काढले. तसेच, नागरिकांनी दंडाची कारवाई टाळण्यासाठी तत्काळ कर भरणा करावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री





## धुमाकूळ घालणारा बिबट्या जेरबंद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिरसगाव** : हरेगाव -शिरसगाव परिसरात गेल्या दोन-तीन वर्षापासून दोन-तीन बिबट्याची दहशत पसरली होती. बिबट्याला पकडण्यासाठी अनेक वेळा पिंजरा लावण्यात आला होता. मात्र बिबट्या त्यात अडकत नव्हता. वन विभागही याकडे फारस गांभीर्याने पाहत नव्हते. आता वारंवार बिबट्या निदर्शनास आल्याने आठ दिवसांपासून पवार व बकाल वस्तीवर पिंजरा लावण्यात आला होता. मनोज बाबासाहेब पवार यांच्या घरापासून बिबट्याने सोमवारी रात्री एक कुत्रे उचलून नेले व निम्मे अर्धे खाल्ले. त्याची फरपट पाहत मागोवा घेण्यात आला. उसात जाऊन पहिले तर अर्धे कुत्रे आढळले. या आधी भागवत बकाल यांछ्या गोठ्यातील कुत्रे धरले होते. बिबट्याच्या वावराने पिंजरा उपलब्ध होताच लगेच विशाल बकाल, नवनाथ बकाल यांनी ट्रक्टर लावून संजय भगवान पवार वस्तीजवळ पिंजरा नेला व अर्धे खाल्लेले कुत्रे पिंजऱ्यात ठेवले. त्यासाठी ओम बकाल, अमोल बकाल, सोमनाथ पवार, शामराव जगताप, प्रतिक बकाल यांचेही सहकार्य झाले. सोमवारी रात्री नऊ वाजता बिबट्या पिंजराजवळ आला. त्याने पिंजऱ्याजवळ चकरा मारल्या. रात्री ११.३० वाजता बिबट्या कुत्रे खाण्यासाठी पिंजऱ्यात घुसला व जेरबंद झाला. ग्रामस्थांनी रात्री पिंजऱ्याची पाहणी केली असता त्यांना बिबट्याचा आवाज आला. जवळ जाऊन पाहिले असात बिबट्या जेरबंद झाल्याचे दिसले. बाळासाहेब बकाल यांनी गणेशराव मुदुले यांना कळविल्यावर वनविभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती देण्यात आली. दिवस उजाडायच्या आत अधिकारी विलास ढगळे व सहकारी आले. सकाळी ८.३० वाजात बिबट्याला दुसऱ्या पिंजऱ्यात बंदिस्त करण्यात आले. येथे अजून बिबट्या असल्याने एक पिंजरा तेथेच ठेवला. यासाठी वस्तीवरील विशाल बकाल, सागर पवार मनोज पवार अधिकाऱ्यांना सहाकार्य केले,

# बनावट ॲप घोटाळा प्रकरणी शनिशिंगणापूर येथे उपोषण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : तालुक्यातील शनिशिंगणापूर येथे बनावट ॲप, बनावट देणगी पुस्तक, बनावट क्यूआर कोड, माध्यमातून झालेला करोडो रुपयांच्या घोटाळाप्रकरणी ठोस कारवाई करण्यात यावी यासाठी कालपासून (मंगळवार) काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी बेमुदत उपोषण सुरु केले आहे.




गेल्या काही दिवसापासून शनिशिंगणापूर देवस्थान ॲप घोटाळ्याने हादरले आहे. येथील काही कर्मचारी, पूजारी यांनी देवस्थानच्या अधिकृत ॲपऐवजी बनावट ॲप तयार करून, बनावट क्यूआर कोडच्या माध्यमातून, बनावट पावती पुस्तकाच्या माध्यमातून देवस्थानला मिळणाऱ्या देणगीचा मोठा अपहार केला. शनिभक्तांनी दिलेल्या देणगीच्या माध्यमातून प्राप्त देवस्थानचा निधी खासगी खात्यावर वळून घेतला. यामुळे देवस्थानचे मोठे आर्थिक नुकसान झाले. तसेच शनिभक्तांचीदेखील फसवणूक झाली. याविरोधात माळवदे यांनी पोलीस अधीक्षक, तसेच धर्मदाय उपायुक्त यांच्याकडे तक्रार केली होती. घोटाळेबहाद्दरांवर ठोस कारवाई करण्याची मागणी केली होती. परंतु समाधानकारक ठोस कारवाई न झाल्याने माळवदे यांनी शनिशिंगणापूर आवारात उपोषण आंदोलनास प्रारंभ केला. यावेळी माळवदे यांनी देवस्थानने तक्रार केलेल्या तीन बनावट ॲपव्यतिरिक्त इतर सात ते आठ ॲपची चौकशी होणे गरजेचे आहे, बनावट पावती पुस्तकाद्वारे, बनावट क्यूआर कोडद्वारे केलेल्या घोटाळ्याची चौकशीची मागणी केली, तसेच देवस्थानने दिलेल्या ॲपच्या परवानगीची चौकशीची मागणी केली. जोपर्यंत ठोस कारवाई होत नाही, पावसाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित होऊन वरिष्ठ पातळीवर चौकशी होत नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा पवित्रा माळवदे यांनी घेतला आहे.

> शिंगणापूर देवस्थान आता शासनाच्या ताब्यात देण्याची वेळ आली असून दिवसेदिवस घोटाळे मालिका वाढत चालली आहे. ॲप घोटाळ्याची व्याप्ती मोठी असून याची वरिष्ठ पातळीवर चौकशी होऊन घोटाळेबहाद्दरांवर कठोर कारवाई होऊन अपहार झालेला निधी परत देवस्थान तिजोरीत जमा होणे गरजेचे आहे. यासाठी ठोस कारवाई झालीच पाहिजे.
>
> **- संभाजी माळवदे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी**

या आंदोलनात काँग्रेसचे संदीप मोटे, महिला काँग्रेसच्या शोभा पातारे, शहर काँग्रेसचे अंजुम पटेल, संजय वाघमारे, संभाजी ब्रिगेडचे शेषराव गव्हाणे, भाजपचे दादा घायाळ, संजय होडगर, कानिफ जगताप, शेतकरी संघटनेचे अशोकराव काळे, हरीश चक्रनारायण, सतीश तऱ्हाळ, विजय गायकवाड, गणपत मोरे आदीसह शनिभक्त उपस्थित होते.

## आ.चव्हाणांचा प्रवास प्रेरणादायी : ना.विखे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील विकासित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष आ.रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली राज्यात भारतीय जनता पक्ष अधिक मजबूतीने काम करून मोठे यश मिळवेल असा विश्वास जलसंपदा मंत्रीराधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.

भारतीय जनता पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदावर आ.रवींद्र चव्हाण यांची निवड झाल्याबद्दल मंत्री विखे यांनी अभिनंदन करुन, शुभेच्छा दिल्या आहेत. आ. चव्हाण यांच्या माध्यमातून संघटनात्मक अनुभव असलेले नेतृत्व प्रदेशाध्यक्ष पदावर विराजमान झाल्याने कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यां मध्ये मोठा उत्साह असल्याचे त्यांनी सांगितले.

आ. चव्हाण यांनी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या माध्यमातून राजकीय कारकीर्दीला सुरुवात केली. कल्याण-डोंबीवली महानगरपालिका आणि डोंबिवली विधानसभा मतदारसंघाचे पहिले आमदार म्हणून त्यांनी विजयाची घोडदौड सुरु केली. सलग चार वेळा या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व ते करीत आहेत. सार्वजनिक जीवनात विकासकामांच्या प्रक्रीयेला पुढे नेण्याचा मोठा अनुभव तसेच एक कार्यकर्ता ते प्रदेशाध्यक्ष अशी त्यांची राहिलेली संघटनात्मक वाटचाल सर्वांसाठीच प्रेरणादायी असल्याचे मंत्री विखे म्हणाले.महायुती सरकारमध्ये विविध मंत्री पदांचा कार्यभार सांभाळताना त्यांनी



नागरी हिताचे निर्णय घेतले. यामध्ये प्राधान्याने राज्यातील रस्ते विकासामध्ये त्यांचे योगदान महत्वपूर्ण आहे. सरकार आणि संघटना यातील योग्य समन्वय साधण्याचा अनुभव आ. चव्हाण यांच्या पाठीशी असल्याने राज्यात भाजपाच्या संघटनात्मक कामाला त्यांचे बहुमोल मार्गदर्शन निश्चित उपयुक्त ठरेल.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य करीत असलेल्या विकासात्मक वाटचालीला संघटनेच्या माध्यमातून भक्कम असे पाठबळ उभे करून आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीतही विधानसभेप्रमाणेच भारतीय जनता पक्ष प्रथम स्थानावर यश मिळवेल असा विश्वास मंत्री विखे यांनी व्यक्त केला.

## प्रवरा नदीवरील ब्रिटिशकालीन पुलासह जुन्या पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट करा

### आ. अमोल खताळ यांनी विधानसभेत लक्षवेधी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : पुणे- नाशिक महामार्गावरील संगमनेर खुर्द आणि संगमनेर बुद्रुकला जोडणारा ब्रिटिशकालीन पूल आजही वापरात आहे. या पुलासह राज्यातील सर्व जुन्या पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करावे, अशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी विधानसभेत केली. संगमनेरातील रखडलेल्या कामाबाबतही त्यांनी शासनाचे लक्ष वेधले.

मुंबई येथे सुरू असलेल्या विधिमंडळ पावसाळी अधिवेशनात आमदार खताळ यांनी हा प्रश्न उपस्थित करत शासनाचे लक्ष वेधले. जुन्या पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करून किती दिवसांमध्ये पूर बांधणी होणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. संगमनेरच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या रस्त्याची कामे ठरलेल्या वेळेत पूर्ण होत नाहीत. शासननिधी खर्च करायला तयार आहे. पण त्यावर काहीही परिणाम होत नाही. त्या मुळे त कामे वेळत पूर्ण होत नाहीत. ही बाब लक्षात घेता वेळेमध्ये काम पूर्ण न करणाऱ्या ठेकेदारांवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी लक्षवेधी सूचना आमदार खताळ यांनी मांडली.

पुणे जिल्ह्यातील इंद्रायणी नदीवरील पूल कोसळून झालेल्या दुर्घटनेत तीन ते चार पर्यटकांचा बळी गेला तर काही जण जखमी झाले. या प्रकरणी दोषी असणाऱ्यांवर अद्याप कारवाई झाली नाही तसेच या प्रकरणाची चौकशी झाली नाही, याकडे आ.खताळ यांनी विधिमंडळाचे लक्ष वेधले. त्यावर उत्तर देताना सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी या दुर्घटनेबाबत एक समिती स्थापन केलेली आहे.त्या समितीचा अहवाल प्राप्त होणे बाकी आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या प्रकरणात जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल, सांगितले.

## टीम इंडियाच्या गोलंदाजांची आज सत्वपरीक्षा

**बर्मिंगहॅमन** : भारत आणि इंग्लंड यांच्यातील अँडसरन-तेंडुलकर करंडकातील दुसऱ्या कसोटी सामन्यास उद्या (बुधवार) सुरूवात होत आहे. पाच सामन्यांच्या मालिकेत इंग्लंडने पहिला कसोटी सामना जिंकून मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. पहिल्या कसोटीत वरच्या फळीतील फलंदाजांनी उत्कृष्ट कामगिरी केली असली तरी टेल एंडरर्सना विशेष चमक दाखवता आलेली नाही. पहिल्या कसोटीत जसप्रित बुमरा वगळता एकही गोलंदाज यशस्वी होऊ शकला नाही. प्रसिद्ध कृष्णा, मोहंमद सिराज, शार्दूल ठाकूर यांनी भरमसाठ धावा दिल्याने भारताल ३७१ धावांच्या लक्ष्याचे रक्षण करता आले नाही. त्यामुळे या कसोटीत गोलंदाजांची सत्वपरीक्षा असणार आहे. गोलंदाजीबरोबरच त्यांना फलंदाजीतही सुधारणा करावी लागणार आहे. तशी सूचना संघाचा मार्गदर्शक गौतम गंभीरने दिल्या आहेत. डझनभर सोडलेले झेल भारताच्या पराभवास कारणीभूत ठरले होते. त्यामुळे टीम इंडियाला क्षेत्ररक्षणातही सुधारणा करावी लागणार आहे. या कसोटीत भारताचा स्टार गोलंदाज बुमराला विश्रांती दिल्यास सिराज, कृष्णा यांच्यारील जबाबदारी अधिक वाढणार आहे.

बर्मिंगहॅममधील एजबॅस्टनला होणार हा भारतासाठी आव्हानात्मक असणार आहे. या मैदानावर भारताला अद्याप एकही विजय मिळवता आलेला नाही. भारतीय संघ या मैदानावर अखेरचा कसोटी सामना २०२२ मध्ये खेळला आहे. विशेष म्हणजे त्या कसोटीत भारतीय संघाने ४१६ धावा करून पहिल्या डावात १३२ धावांची मोठी आघाडी घेतली होती. मात्र, दुसऱ्या डावात भारताने निराशा केली होती. भारताने दिलेले ३७८ धावांचे लक्ष्य इंग्लंडने तीन विकेटच्या मोबदल्यात सहज साध्य केले होते. त्यामुळे भारताचे इंग्लंडमध्ये मालिका विजयाचे स्वप्न भंगले होते. टीम इंडिया संघात एक बदल करू शकतो. शार्दूल ठाकूरच्या जागी फिंगर स्पिनर कुलदीप यादवला या सामन्यात संधी मिळू शकते. जर बुमराला विश्रांती दिली तर अष्टपैलू खेळाडू नितीश रेड्डीलाही संघात स्थान मिळू शकते. बऱ्याच वर्षात संघात पुनरागमर करणाऱ्या करूण नायरला पहिल्या कसोटीत फारसा प्रभाव पाडता आला नव्हता. मात्र तरीही त्याला अजून एक संधी दिली जाण्याची शक्यता जास्त आहे,

## धनादेशांचा अनादर, फिर्यादीस नुकसाभरपाई देण्याचे आदेश

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर** : वैजापूर नागरी सहकारी पतसंस्थेकडून कर्ज म्हणून घेतलेल्या रकमेच्या परताव्यासाठी दिलेला धनादेश न वटता अनादरीत होऊन परत आल्याप्रकरणी आरोपीस ७० हजार रुपये नुकसाभरपाई फिर्यादी वैजापूर नागरी सहकारी पतसंस्थे द्यावी व रक्कम नाही भरल्यास एक महिना साध्या कारावासाची शिक्षा असे आदेश मुख्य न्यायदंडाधिकारी तथा दिवाणी न्यायाधीश डी. एस. पिसाळ यांनी दिले.

वैजापूर येथील वैजापूर नागरी सहकारी पतसंस्थेकडून आरोपी लताबाई नंदू जेजुरकर ( वय सज्ञान, रा. किनगाव, तालुका फुलंब्री, जिल्हा छत्रपती संभाजीनगर) यांनी कर्ज घेतले होते. कर्जाऊ घेतलेल्या रकमेची ठरल्याप्रमाणे परतफेड न केल्यामुळे फिर्यादीने आरोपीकडे सदर रकमेची मागणी केली. आरोपीने फिर्यादीस वैजापूर नागरी सहकारी पतसंस्था वैजापूर या नावाने २ फेब्रुवारी २०२१ रोजी ७० हजार ३३५ रुपयांचा भारतीय स्टेट बँक शाखा वैजापूरचा धनादेश दिला. फर्यादीने धनादेश बँकेत वटविण्यासाठी टाकला. परंतु पुरेशा रकमेअभावी तो परत आला. धनादेश न वटता अनादरित होऊन परत आल्यानंतर फिर्यादिने आरोपीस नोटीस पाठवून अनादरीत झालेल्या धनादेशाची रक्कम जमा करण्यास सांगितले होते. परंतु नोटीस मिळूनही आरोपीने धनदेशाची रक्कम मुदतीत जमा केली नाही. त्यामुळे फिर्यादीने आरोपीविरुद्ध वैजापूर येथील न्यायालयात धाव घेऊन ॲड. मजहर बेग यांच्यामार्फत फिर्याद दाखल केली होती. न्यायालयाने उपरोक्त प्रकरणातील परिपूर्ण फिर्याद, साक्षीपुरावा व फिर्यादीचे वकिलांचा प्रभावी युक्तिवाद ग्राह्य धरून वरीलप्रमाणे आदेश केला.




# अहिल्यानगरच्या समस्या उघडकीस; प्रभाग सहा - प्रशासकीय दुर्लक्षाचा बळी!

## कचऱ्याचा डोंगर, बंद पथदिवे आणि वाढती लोकसंख्या; प्रशासनाच्या आश्वासनांची झाली कचराकुंडी

**राष्ट्र सह्याद्री प्रभागनामा**
**रोहिणी पवार, अहिल्यानगर**

**अहिल्यानगर : अहिल्यानगर शहरात एकूण १७ प्रभाग असून, प्रत्येक प्रभागात नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या वेगवेगळ्या आहेत. रस्ते, गटारे, कचरा व्यवस्थापन, पाणीटंचाई, वीज, आरोग्य सुविधा अशा विविध बाबींमध्ये लोकांचे जगणे अडथळाग्रस्त झाले आहे. 'राष्ट्र सह्याद्री' कडून या समस्यांचा मागोवा घेणारी विशेष मालिका - प्रभागनामा : अहिल्यानगरच्या समस्या उघडकीस - आजपासून सुरू करत आहोत. या मालिकेअंतर्गत रोज एका प्रभागातील वास्तव आणि नागरिकांच्या भावना मांडल्या जातील.**

या मालिकेच्या पहिल्या भागात पाहूया शहराचा प्रभाग क्रमांक सहा. सुमारे १९,५२७ लोकसंख्या असलेल्या या प्रभागात किमान नागरी सुविधा देखील कोलमडल्याचं चित्र दिसत आहे. कचऱ्याचे ढिग, दुर्गंधी, बंद पथदिवे आणि प्रशासनाची निष्क्रियता यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. विशेष म्हणजे गेल्या पाच-सहा महिन्यांपासून ही परिस्थिती बदललेली नाही.



### कचऱ्याचं साम्राज्य - आरोग्यावर गंभीर परिणाम

प्रभागात घनकचरा व्यवस्थापन पूर्णपणे अपयशी ठरल्याचं स्पष्ट आहे. दर आठ दिवसांनी एकदाच कचऱ्याची गाडी येते, तोपर्यंत विविध ठिकाणी कचऱ्याचे ढिग जमा होतात. लहान मुले याच परिसरात खेळत असून सांडपाण्यामुळे मच्छर, दुर्गंधी आणि आजारांचे प्रमाण वाढत आहे.नागरिकांनी आयुक्तांना वेळोवेळी निवेदने दिली, तक्रारी केल्या, परंतु त्याचे कोणतेही ठोस पडसाद प्रशासनाने दिलेले नाहीत. आम्ही बघतो हेच आश्वासन नेहमीच दिलं जातं, मात्र प्रत्यक्षात काम शून्यच आहे.

> **प्रशासनाला प्रश्न**
>
> **इतक्या मोठ्या लोकसंख्येच्या प्रभागात किमान सुविधा का नाहीत?**
>
> **नागरिकांच्या निवेदनांवर कारवाई का नाही?**
>
> **केवळ कामांचं श्रेय घेणं आणि आश्वासनं देणं, हीच योजना आहे का?**



### पथदिवे बंद - अंधारात चालणंही मुश्किल

या प्रभागातील अनेक भागात पथदिवे बंद आहेत. रस्त्यांवरील वीजखांब झाडांच्या वेलींनी झाकले गेले असून, त्यामुळे लाईटचं कव्हरेज पूर्णपणे गमावलं आहे. रात्रीच्या वेळी रस्त्यावर अंधार पसरतो, जो महिलांसाठी, विद्यार्थ्यांसाठी आणि वृद्धांसाठी धोकादायक ठरतो. प्रकाशाच्या अभावामुळे अपघात, चोरी यांना निमंत्रण मिळतंय. पाणी आणि लाईट प्रश्न कायम, रस्ते मात्र केले 'शोभेसाठी' प्रभागात रस्त्यांची काही कामं करण्यात आली, पण त्याही अनेकदा अर्धवट. पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही आजवर सुटलेला नाही. लाईट आणि कचऱ्याच्या प्रश्नाने जनता वैतागली आहे.

### *नागरिकांचा संताप*

*स्थानिक रहिवासी म्हणतात, आम्ही आरोग्यासाठी, सुरक्षिततेसाठी बोलतो आहोत, पण आमचं ऐकणं कुणाला वेळ नाही. एक वेळ कचऱ्याच्या ढिगावरून राजकारण होईल, पण त्यावर उपाय नाहीच! प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे प्रभाग सहा हा आज एका 'अनुत्तरीत प्रश्नां'चा ठिकाणा बनला आहे. विकास हे केवळ रस्त्यांपुरतं मर्यादित असू नये. आरोग्य, स्वच्छता, प्रकाश व्यवस्था, पाणीपुरवठा या मूलभूत गरजांकडे लक्ष देणं हीच खरी जबाबदारी आहे. केवळ निवडणुका जवळ आल्या की प्रभागाचे दौरे करणं पुरेसं नाही - हे प्रशासनाने समजून घ्यायला हवं. अन्यथा जनता प्रश्न विचारेल - हे आमचं शहर आहे की केवळ तुमचं घोषणापत्र?*

**प्रतिक्रिया..**

### नागरिकांचा संताप उफाळला

स्थानिक रहिवासी म्हणतात, खूप वेळा आयुक्तांना भेटून, निवेदनं देऊन आम्ही सांगून थकलो आहोत. दरवेळी फक्त आश्वासनंच मिळतात. प्रशासन आणि संबंधित अधिकाऱ्यांना या समस्यांचं गांभीर्यच नाही. आम्ही आवाज उठवला, की 'बघतो', 'सांगतो', 'होईल' असं उत्तर देऊन वेळ मारून नेली जाते. आता पुरे झालं!
लवकरच या कचऱ्यांची योग्य विल्हेवाट न लावल्यास आम्ही सर्व नागरिक महापालिकेत मोर्चा काढू. आणि इथल्या कचर्याचे ढिग सरळ महापालिकेच्या प्रवेशद्वारावर नेऊन टाकू, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

---

मुलं शाळेतून संध्याकाळी घरी येतात, रस्त्यावर अंधार असतो. कचऱ्याच्या ढिगाजवळूनच यावं लागतं. पाय घसरतात, घाण वास येतो. सर्दी-खोकल्याने त्रास होतो. एकदा आमचं मूल चुकून त्या घाणीवरून घसरून पडलं... कोण जबाबदार? प्रशासन फक्त फोटो काढून जातं, काम काहीच नाही!
**- पुष्पा कदम (रहिवासी, अहिल्यानगर प्रभाग ६)**

---

आमच्या दुकानासमोर नेहमीच कचरा टाकला जातो. ग्राहक येण्याऐवजी नाक धरून जातात. इतक्या वेळा फोन करून सांगितलं पण कोण ऐकत नाही. हलगर्जीपणा इतका की, आम्ही कधी कधी स्वतःच साफसफाई करतो. पण रोजचा हा त्रास नको वाटतो. आता नागरिक एकत्र येत आहेत, काहीतरी मोठं पाऊल उचलावं लागणार हे निश्चित!
**- स्थानिक दुकानदार**